RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक

विदर्भाचा मानबिंदू

# विदर्भ केसरी

मुख्य संपादक : अमोल कटाळे

www.vidarbhkesari.com

जनतेच्या मनात राज करणारे विदर्भातील एकमेव दैनिक

अमरावती

२ शुक्रवार जानेवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २१७

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

## पहिल्या दिवशी ११ उमेदवारांची माघार

▸विदर्भ केसरी। अमरावती,

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल केलेल्यांच्या अर्जाची काल छानणी झाल्यानंतर गुरूवार अर्ज मागे घेण्याचा पहिला दिवस होता. एकूण ११ उमेदवारांनी माघार घेतली. शुक्रवार अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतरच रिंगणातल्या उमेदवाराची अंतिम यादी समोर येणार आहे. छानणी दरम्यान १४ उमेदवारांचे अर्ज बाद झाले होते. त्यानंतर २२ प्रभागतल्या ८७ जागेसाठी ८१९ उमेदवारांचे अर्ज वैध घोषीत करण्यात आले. त्यापैकी अर्ज मागे घेण्याच्या गुरूवारी पहिल्या दिवशी ११ उमेदवारांनी माघार घेतली. त्यात प्रभाग १ मधून प्रिया तायडे, प्रभाग ७ मधून वैभव बजाज, प्रभाग १२ मधून विनय माहुरकर, प्रभाग ६ मधून आनंद गुप्ता, प्रभाग १७ मधून दिवाकर गवई, प्रभाग १४ मधून सुरया शाहीन, प्रभाग १५ मधून मोहम्मद जावेद, प्रभाग १६ मधून रूखसाना बानो, प्रभाग २२ मधून विश्वजीत डुमरे, प्रभाग १० मधून सुरेखा त्यागी, दीपक उत्तराधी यांचा समावेश आहे. आता ८०८ उमेदवार रिंगणात आहे. अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवार दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. या काळात किती उमेदवार माघार घेतात त्यानंतर निवडणुकीतल्या अंतिम उमेदवारांची संख्या स्पष्ट होणार आहे. ३ जानेवारीला प्रभागनिहाय अंतिम उमेदवाराची यादी घोषीत करून चिन्हाचे वाटप केले जाणार आहे.



## थंडीचा कडाका कायम

▸विदर्भ केसरी। नागपूर,

नवीन वर्षाच्या सुरुवातीला थंडीचा कडाका कायम असून, नागपूरचे कमाल तापमान २९.० अंश सेल्सिअस तर किमान तापमान १०.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हवामान विभागाच्या माहितीनुसार उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे नागपूरसह किमान तापमानामध्ये चढ-उतार सुरूच आहेत. तर काही ठिकाणी गारठा वाढला असून, गारेगार वातावरण आहे. डिसेंबर महिन्यातील १७ दिवस तापमान १० अंशांच्या खाली असताना आता तापमानामध्ये चढ-उतार होत आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला तापमान घसरले होते. मंगळवारी किमान तापमान ८.६ अंश सेल्सिअसपर्यंत खाली होते. तर विदर्भातील सर्वात थंड शहर म्हणून नागपूर होते. महिन्यातील पुढील काही दिवसही थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे.

# भाजपसह शिवसेनेचीही विजयाची घोडदौड सुरु

## कल्याण-डोंबिवली महापालिकेत 9, तर राज्यभरात 13 नगरसेवक बिनविरोध

▸विदर्भ केसरी।

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या नाट्यातून पुढे येत आता अर्जांची छानणी केली जात असून यात राजकीय पक्ष एकमेकांना धक्के देत आहेत. तर काही ठिकाणी बिनविरोध विजयाचे गुलाल उधळण देखील सुरू झाली आहे. भाजपने कल्याण डोंबिवलीमध्ये विजयाचा गुलाल उधळल्यानंतर आता केडीएमसी महापालिकेत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या युतीचे तब्बल 9 नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपचे 5 आणि शिवसेना शिंदे गटाचे 4 उमेदवार बिनविरोध झाले आहेत.



कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या महायुतीने मतदानापूर्वीच विजयाचा गुलाल उधलण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे 5 आणि शिवसेना शिंदे गटाचे 4 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे 122 सदस्य संख्या असलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेल्या 62 जगांपासून महायुती आता केवळ 53 जागा दूर आहे. त्यामुळे भाजप, शिवसेनेत जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्याने भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रणनीती यशस्वी ठरत असल्याचे बोलले जात आहे. मात्र, आता शिवसेना शिंदे गटाचेही 4 उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने खासदार श्रीकांत शिंदे यांची खेळी यशस्वी झाली असल्याचे पाहायला मिळत आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत मतदान होण्यापूर्वीच भाजपची विजयी घोडदौड सुरू झाली आहे. रेखा चौधरी, आसावरी नवरे, रंजना पेंकर, मंदा पाटील यांच्यासह आता ज्योती पवन पाटील या 24 ब मधून बिनविरोध निवडून आल्या आहेत. ज्योती पवन पाटील यांच्यामुळे बिनविरोध निवडून येणाऱ्या भाजप उमेदवारांची संख्या आता 5 वर पोहोचली आहे. याचे श्रेय रवींद्र चव्हाण यांच्या रणनीतीला दिले जात आहे.

### शिवसेना शिंदे गटाचेही वर्चस्व

■ कल्याण डोंबिवलीमध्ये शिवसेना शिंदे गटाकडून पॅनल क्र. 24 मधून रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली रणजित जोशी तर प्रभाग क्र. 28 अ मधून हर्षल राजेश मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. आमदारे राजेश मोरे यांचे हर्षल मोरे हे चिरंजीव आहेत. येथील सर्व अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर या निवडणुका बिनविरोध झाल्या. तसेच याचे श्रेय खासदार श्रीकांत शिंदे यांना दिले जात आहे.

### राज्यभरात महायुतीच्या 13 जागा बिनविरोध

■ कल्याण डोंबिवलीसह राज्यभरातही महायुतीची घोडदौड सुरूच असल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपने धुळे महानगरपालिकेत 2, पनवेल महानगरपालिकेत 1 जागा बिनविरोध करत, राज्यात 8 जागांवर बिनविरोध उमेदवार विजयी केले आहेत. तर शिवसेना शिंदे गटाने केडीएमसीत 4, जळगावमध्ये 1 जागा बिनविरोध करत राज्यभरात 5 जागा बिनविरोध केल्या आहेत. दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची अहिल्यानगरमध्ये एक जागा बिनविरोध निवडून आली आहे. त्यामुळे राज्यात भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीच्या एकूण 13 जागा बिनविरोध झाल्या असल्याचे दिसून येत आहे.

## नववर्षाच्या प्रारंभीच दर्यापुरात तीन अपघात


### ⏩ दोघांचा जागीच मृत्यू

▸विदर्भ केसरी। दर्यापूर,

बैलगाडी व दुचाकीच्या झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील एकाचा तर बैलगाडीमधील एक असा दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटना बुधवार ३१ डिसेंबरला नववर्षाच्या पूर्वसंध्येला दर्यापूर अमरावती मार्गावरील लखापूर जवळील मुख्य पुलावर रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली.

या अपघातात तिघे गंभीर जखमी झाले आहेत. यासह गुरूवारी सकाळी आराळा फाट्यावर दोन दुचाकीची समोरासमोर धडक झाल्याने एक जण ठार तर अन्य दोन जखमी झाले आहे या अपघातात एका तरुणीचा देखील समावेश असून ती सुद्धा गंभीर जखमी आहे.

मृतकांमध्ये आर्यन जाधव (वय१९) रा. खापर्डे बगिचा अमरावती व बैलगाडीमधील सूर्या (वय २२) रा. भैसदही म. प्र. या दोघांचा समावेश आहे. तर दुसऱ्या अपघातात अकोला येथील ईश्वर कांबेकर मृत झाला आहे तर सोबत असलेली सपना मंगल दुर्वेश वय २१ रा. अकोला ही जखमी आहे. जखमींमध्ये प्रसन्न नितीन माटे (वय१९), प्रज्वल गुरुदेव उमेकर (वय१९), पार्थ रवि गाभणे (वय२०) सर्व अमरावती येथील रहिवासी आहेत. पृथ्वी नाईक रा. नावेड ता दर्यापूर हे जखमी आहेत. अमरावती येथील चार



मित्र दोन दुचाकीने खोलापूर मार्गे दर्यापूर तालुक्यातील लासूर येथील आनंदेश्वर मंदिरात दर्शनासाठी जात होते. दरम्यान लखापूर फाट्यानजिक मुख्य पुलावरून कापूस भरलेली बैलगाडी रस्ता ओलांडत असतांना दुचाकी त्यावर जाऊन जोरदार धडकली.

या अपघातात दुचाकीवरील आर्यन जाधव व बैलबंडीतील सूर्या या दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला. दुसऱ्या अपघातात दोन्ही दुचाकी समोरासमोर धडकल्याने आराळा फाट्यावर अपघात झाला. घटनेची माहीती मिळताच शिंदे शिवसेनेचे रुगणसेवक गोपाल अरबट रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी पोहचले व मृतक आणिजखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

■ यांसह गुरूवारी सकाळी तिसरा अपघात तालुक्यातील सासन फाट्याजवळ ऑटो उलटून झाला असून त्यात चार जण जखमी असून जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे तातडीने दाखल करण्यात आले. यावेळी गोपाल अरबट, बंटी कुऱ्हाडे, राहूल भुंबर, हेमंत उमाळे, सागर गेठे यांनी तातडीने मदत करीत तीनही अपघातातील जखमीना रुग्णालयात दाखल केले. युवकांनी केलेल्या मदतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जानेवारीतही थंडीच्या लाटा कायम

▸विदर्भ केसरी। नागपूर :

डिसेंबरमध्ये छळणाऱ्या थंडीपासून जानेवारी महिन्यातही दिलासा मिळण्याचे चिन्ह नाहीत. तीव्रता कमी राहणार असली तरी थंडीचा प्रभाव मात्र कायम राहणार आहे. मध्य भारतासह उत्तरेकडील काही राज्यात एक-दोन वेळा थंडीची लाट येण्याचीही शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने पत्रकाद्वारे याबाबतचा अंदाज व्यक्त केला आहे.

वेधशाळेने गुरुवारी जानेवारी ते मार्च २०२६ या काळातील हवामानाचे निरीक्षण जारी केले. या निरीक्षणानुसार जानेवारी महिन्यात उत्तर भारत व मध्य भारतात रात्रीचे तापमान मासिक सरासरीच्या खालीच राहण्याची शक्यता आहे. यात विदर्भाचाही समावेश आहे. उत्तर-पश्चिम भारतातील पूर्व व पश्चिम उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मिर व लद्दाख या राज्यात, तसेच मध्य भारतातील मध्य प्रदेश, झारखंड, विदर्भ या भागात किमान तापमान मासिक सरासरीच्या खाली राहण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या प्रदेशात थंडीच्या लाटा येण्याची शक्यता नेहमीच्या सरासरीपेक्षा अधिक राहण्याचाही अंदाज आहे. मध्य भारतातही एक ते दोन वेळा थंड लाटेचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. मध्य भारतात दिवसाचे कमाल तापमान मात्र सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे. पूर्वोत्तर राज्ये आणि दक्षिणेकडील राज्यात मात्र तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे.

■ वेधशाळेने पावसाबाबतही अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह मध्य भारतात जानेवारी महिन्यात अवकाळी पावसाची शक्यता नेहमीच्या सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. मात्र मार्चपर्यंत तीन महिन्याच्या काळात होणारा पाऊस नेहमीच्या सरासरीपेक्षा अधिक असेल, असा अंदाज आहे. विशेषत: मध्य भारत आणि उत्तर प्रदेशाच्या मैदानी क्षेत्रात तीन महिन्याच्या काळात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याचे भाकितही वेधशाळेने वर्तवले आहे.

## एकाच दिवसात ४४ जणांवर कारवाई!

▸विदर्भ केसरी।

महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे.

गुरुवार (ता. 01) शोध पथकाने 44 प्रकरणांची नोंद करून 27,600 रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी थुंकणे (रु. 200 दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 200 रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी/ उघडयावर मलमुत्र विर्सजन करणे (रु. 500 दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 500 रुपयांची वसुली करण्यात आली.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता करणे (रु. 400 दंड) या अंतर्गत 13 प्रकरणांची नोंद करून 5,200 रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू. 100 दंड) या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून 100 रूपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉंजिग, बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 6,000 रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 13 प्रकरणांची नोंद करून 10,000 रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर,मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून 1,000 रूपयाची वसुली करण्यात आली.

■ तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. जी. एच. इन्फ्रा यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्यामुळे रू. 10,000 चे दंड वसुल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत मे. ग्रँड अजंता बिल्डर्स यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्यामुळे रू. 10,000 चे दंड वसुल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. धकाते सोनपापडी यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000 दंड वसूल करण्यात आले. आशीनगर झोन अंतर्गत योगेश शेंडे यांनी बोअरवेल खोदून रस्त्यावर चिखल आणि कचरा पसरविल्याबद्दल रु. 5,000 दंड वसूल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने 04 प्रकरणांची नोंद करून रू. 30,000 दंड वसुल केला.

## बायको एका पक्षात, नवरा दुसऱ्या पक्षात, स्वाभिमान कुठे आहे? : बच्चू कडूंची टीका

▸विदर्भ केसरी। अमरावती :

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आरोप-प्रत्यारोपांचेही सत्र सुरू झाले आहे. भाजपची उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या काही कार्यकर्त्यांनी गुरूवारी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांची भेट घेतली. सर्वच राजकीय पक्षांकडून निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय केला जातो. बाहेरच्या लोकांना उमेदवारी दिली जाते. या कार्यकर्त्यांनी आयुष्यभर सतरंज्याच उचलायच्या का, असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला. भाजपमध्ये सावळागोंधळ सुरू आहे. बायको भाजपमध्ये आहे, तर नवरा युवा स्वाभिमान पक्षात आहे. दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे आहेत. आता राणा दाम्पत्याचा स्वाभिमान कुठे गेला, अशी टीका बच्चू कडू यांनी केली.

बच्चू कडू म्हणाले, सतरंज्या उचलण्यासाठी राजकीय पक्षांना कार्यकर्ते लागतात. निवडणुका आल्या की त्यांना पैसेवाले दिसतात. पक्षासाठी रक्ताचे पाणी करणाऱ्यांना डावलले जाते. अमरावती जिल्ह्यात माजी आमदार अरूण अडसड यांचे पूत्र प्रताप अडसड हे एक मूळ भाजपचे आमदार सोडले, तर इतर सर्व आमदार हे दुसऱ्या पक्षातून भाजपमध्ये आले आहेत. माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे, तिवसाचे आमदार राजेश वानखडे, मोर्शीचे आमदार उमेश यावलकर, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे, मेळघाटचे आमदार केवलराम काळे हे मूळचे भाजपचे आहेत का. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता आहे, तरीही निष्ठावान कार्यकर्त्यांना निवडून आणण्याची ताकद भाजप ठेवत नाही. सत्ता आली, तरी कार्यकर्त्यांना काहीच मिळत नाही. पुन्हा सतरंज्या उचलायच्या आणि तेही काँग्रेसवाल्यांच्या अशी विचित्र स्थिती भाजपमध्ये सध्या आहे.



■ बच्चू कडू म्हणाले, भाजपमध्ये जी मस्ती आली आहे, ती आता कार्यकर्त्यांनाच ठेचावी लागणार आहे. विधानसभेपर्यंत ठीक आहे. पण आता महापालिका निवडणुकीतही भाजप जर निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारी देत नसेल, तर तुमची मर्दानगी कुठे गेली. केंद्रात आणि राज्यात सत्ता असताना तुम्ही तुमच्या पक्षातील नगरसेवक निवडून आणू शकत नाही. तुम्हाला बाहेरचे लोक उसणे आणावे लागतात. याची लाज वाटली पाहिजे.

## व्यवसायिक सिलिंडर १११ रुपयांनी महागले

### वर्षाच्या पहिल्याच दिवशी महागाईचा मारा : ७.3 टक्क्यांची गुरुवारी कपात

▸विदर्भ केसरी। मुंबई :

नवी दिल्ली : केंद्र सरकारने वाणिज्य वापराच्या एलपीजीचे दर सिलिंडरमागे १११ रुपयांनी वाढवण्याची गुरुवारी घोषणा केली. तर विमानाचे इंधन म्हणून प्रचलित एव्हिएशन टर्बाइन फ्युएलमध्ये (एटीएफ) दर किलो लिटरमागे ७,३५३.७५ रुपयांनी म्हणजेच ७.३ टक्क्यांची गुरुवारी कपात करण्यात आली.

तेल कंपन्यांनी वाणिज्य एलपीजीच्या किमतीत १११ रुपयांनी वाढ केल्याने १९ किलोग्रॅमच्या सिलिंडरची किंमत १,६९१.५० रुपये (दिल्ली) झाली आहे. मुंबईत वाणिज्य एलपीजीची किंमत आता प्रति सिलिंडर १,५३१.५० रुपयांवरून वाढून १,६४२.५० रुपये करण्यात आली आहे. ही दरवाढ दोन महिन्यांच्या दरकपातीनंतर झाली आहे. शेवटची दरकपात १ डिसेंबर २०२५ रोजी १९ किलोच्या सिलेंडरमागे १५.५० रुपये अशी करण्यात आली होती. त्यापूर्वी दर प्रति सिलेंडर ५ रुपयांनी कमी करण्यात आला होता.



व्यावसायिक एलपीजीचे दर आता गेल्या वर्षी जूनपासूनच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले आहेत. घरातील स्वयंपाकासाठी वापरल्या जाणा-या घरगुती एलपीजीच्या किमती एप्रिल २०२५ मध्ये ५० रुपयांच्या वाढीनंतर, १४.२ किलोच्या सिलिंडरसाठी ८५३ रुपयांवर कायम राहिल्या आहेत. ताज्या दर कपातीनंतर विमानाच्या इंधनाचे दर मुंबईमध्ये हे दर किलोलिटरला ८६,३५२.१९ रुपयांपर्यंत, तर दिल्लीत आता हे दर किलोलिटरला ९२,३२३.०२ पर्यंत कमी झाले असल्याचे सरकारी तेल कंपन्यांनी स्पष्ट केले. या कपातीमुळे विमान कंपन्यांवरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे, कारण त्यांच्या परिचालन खर्चापैकी जवळपास ४० टक्के खर्च इंधनावर होतो. दरातील बदलाच्या परिणामाबद्दल विमान कंपन्यांकडून तात्काळ कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

### पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर

■ गेल्या वर्षी मार्चमध्ये प्रति लिटर २ रुपयांची कपात केल्यानंतर पेट्रोल आणि डिझेलच्या किमती स्थिर आहेत; सध्या मुंबईत पेट्रोलची किंमत १०३.५ रुपये प्रति लिटर आणि डिझेलची किंमत ९०.३ रुपये आहे.

## प्रेमी युगुलाची आत्महत्या

▸विदर्भ केसरी। अकोला :

जिल्ह्यातील एका धक्कादायक घटनेने प्रचंड हळहळ व्यक्ती केली जात आहे. प्रेमी युगुलात अतुट प्रेम. कुटुंबाचा मात्र लग्नाला विरोध. अखेर दोघांनी टोकाचा निर्णय घेऊन धावत्या रेल्वे गाडीपुढे स्वत:ला झोकून दिले. कुटुंब व समाजाच्या विरोधामुळे प्रेमी युगुलाचा जीव गेला. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. अक्षय सुरेश थारकर (वय ३२) असं मृत तरुणाचे, तर अक्षदा मोहन शेजोळे ( वय २४) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे.

प्रेम म्हणजे आपुलकीची भावना. त्यात काळजी व भावनिक जोड असते. जाती, धर्म, गरिबी, श्रीमंती यातून अनेक वेळा प्रेमाला विरोध होतो. या विरोधामुळे प्रेम मात्र संपत नाही.




प्रेमाला होणाऱ्या विरोधातून अनेक वेळा प्रेमी युगुलाकडून टोकाचा निर्णय घेतला जातो. अकोला जिल्हा याच प्रकारच्या एका घटनेने चांगलाच हादरला आहे. जिल्ह्याच्या बाळापूर तालुक्यातील शेळद गावातील अक्षय सुरेश थारकर व अक्षदा मोहन शेजोळे यांचे मृतदेह कसुरा गावाजवळील रेल्वे मार्गावर आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच उरळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.

दोघांमध्ये गेल्या काही वर्षांपासून प्रेमसंबंध होते. मात्र, दोन्ही कुटुंबांनी त्यांच्या लग्नाला विरोध केला होता. अक्षदा शेजोळे एका कॉन्व्हेंटवर कार्यरत होत्या, तर अक्षय थारकर वाहन चालक म्हणून कार्य करीत होते.

■ लग्नाला होणाऱ्या सततच्या विरोधामुळे दोघांनी जीवन संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतला. दोघांनी एकत्रित आपले जीवन संपवले. या दुर्दैवी घटनेमुळे गावासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून शोककळा पसरली आहे. या प्रकरणी उरळ पोलीस पुढील तपास करीत आहेत.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

शुक्रवार, २ जानेवारी २०२६ | २

## अग्रलेख

# आनंदगान

*नवं वर्ष म्हणजे केवळ दिनदर्शिकेचं पान उलटणं नाही, तर नात्यांची, माणूसपणाची आणि संवेदनशीलतेची नव्याने उजळणी आहे. प्रगतीच्या धावपळीत हरवत चाललेला संवाद, प्रेम आणि स्नेहबंध पुन्हा शोधण्याचं हे नववर्षाचं आनंदगान आहे. दिनदर्शिकेचे एक एक पान उलटत जाते आणि वर्ष कधी संपते, हे कळतही नाही. आणखी काही तासांनी कॅलेंडरीय गणनेनुसार नव्या वर्षाचा प्रारंभ होईल आणि नव्या आशा-आकांक्षांचा सूर्योदय नव्या क्षितिजांकडे वाटचाल करू लागेल. मावळत्या वर्षाच्या कडू-गोड आठवणींची शिदोरी गाठीशी घेऊन पुनश्च एकदा मर्त्यमानव आणि त्या जोडीला यंत्रमानव नव्या दिशेने प्रयाण करू लागेल. ऋतू यावेत, जीवनात त्यांनी रंग भरावेत आणि मानवी आयुष्य समृद्ध करावे, अशी एक साधारण अपेक्षा असते. ऋतूंचे सोहळे आपल्या मनपटलावर रुजत असतात आणि त्यांचे अर्थ नव्याने उमगत असतात. खरे तर, वर्षाचा बदल होणे ही निव्वळ आकडेमोडीची प्रक्रिया नसते. आयुष्यातले एक वर्ष कमी होत असताना त्या वर्षाने दिलेल्या अनुभवांनी अवघे जीवन समृद्धीकडे जात असते. प्रश्न असतो तो या अनुभवांसाठी आपल्याला नेमकी काय किंमत मोजावी लागते, याचा. ही किंमत किती आणि ती आपण कशा प्रकारे स्वीकारतो, यालाही महत्त्व असते. एका राजाने पुढच्या पिढीला संदेश देण्यासाठी राज्यातील सर्व विचारवंतांना थोडक्यात तत्त्वज्ञान लिहायला सांगितले, तेव्हा खूप मंथनानंतर एकच वाक्य तयार झाले, ते म्हणजे 'येथे प्रत्येक गोष्टीची किंमत चुकवावी लागेल.' याचा गांभीर्याने विचार केला, तर बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतील. आजच्या धकाधकीच्या आयुष्यात, छोट्या कुटुंबांमध्ये प्रत्येकाच्या समस्या वेगळ्या आहेत. घरातल्या कोणाचे दुखले-खुपले, तर कपाळाला बाम लावून मायेची बोटं फिरवणारी माणसे आज मिळत नाहीत. घरातल्यांची इच्छा असूनही कोणाकडे तसा वेळ नाही. आई-बाबा हे कुटुंबाचे मुख्य खांब; पण रोजचा जीवनव्यवहार चालवण्याच्या व्यापात ते इतके व्यग्रा आहेत की, त्यांना आपल्या पिलांकडे लक्ष द्यायलाही सवड नाही. दुसरीकडे, प्रत्येकाला स्वतःची 'स्पेस' हवी आहे; पण ही स्पेस आनंदात जगता यावी, यासाठी मायेचा भक्कम आधारही हवा आहे. पैसा मिळवणे आणि करिअरच्या नादात यशाची शिखरे सर करताना पायाखालचा आधार मात्र पोखरत चालला आहे. आपल्या बाळाच्या वाढत्या वयातील लीला बघायला पालकांकडे वेळ नाही. अशा वेळी रस्ता चुकलेले मूल पालकांना शरमेने मान खाली घालायला लावेल की काय, अशी भीती वाटते. येथे दोष कोणाचा नसून तो परिस्थितीचा आणि आयुष्यात नेमके काय हवे आहे, हे न कळलेल्या पिढीचा आहे. नव्या वर्षात ही विसंगती टळावी आणि कुटुंबे अधिक एकसंध व्हावीत. प्रगतीच्या वेगवान चक्रात माणसाकडे भौतिक साधने वाढली; पण हृदय मात्र संकुचित होत गेले. माहिति-तंत्रज्ञानाच्या विस्फोटामुळे रोजगाराचे प्रमाण वाढले, पगार वाढले, जगातील अब्जाधीशांच्या यादीत भारतीयांची संख्या वाढली; पण इंटरनेटच्या स्क्रीनवरचा संवाद जेवढा वाढला, तेवढाच मनातला संवाद तुटत गेला. गेल्या वर्षात आत्महत्या करून सोशल मीडियावर स्वतःलाच श्रद्धांजली वाहणारे तरुणही आढळले. ज्या वयात जीवन कळायला हवे, त्या वयात टोकाचे पाऊल उचलले जात आहे, हे न पचणारे आहे. बोगद्याच्या काळ्या वातावरणात जसा प्रकाशाचा किरण हवा असतो, तसाच आयुष्यातही स्नेहबंधांचा प्रकाश हवा आहे. वैयक्तिक जीवनासोबतच 2025 हे वर्ष भारतीयांसाठी लक्षणीय ठरले. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचा टॅरिफ बडगा असो, जीएसटीमधील सुधारणा असोत, सोन्या-चांदीच्या भावांमध्ये झालेली ऐतिहासिक वाढ असो किंवा प्रयागराजमधील महाकुंभमेळा असो किंवा क्रिकेटसह क्रीडाविश्वामध्ये भारतीय प्रतिभावंत तरुण-तरुणींनी उमटवलेली छाप असो किंवा अपघातांच्या दुर्दैवी मालिका असोत... या कडू-गोड आठवांच्या स्मृती घेऊन आपण नव्या वर्षात प्रवेश करणार आहोत. नव्या वर्षात राजकीय आणि सामाजिक बदल घडत असताना शांतता, सौहार्द, सलोखा नांदावा ही कोणाही सुजाण नागरिकाची स्वाभाविक अपेक्षा आहे. देशापुरता विचार करायचा झाल्यास प्रत्येक भारतीयाच्या कुटुंबाचे बंध अधिक बळकट व्हावेत, स्वप्ने फुलावीत आणि माणूसपणाच्या खुणा जपत असताना आपल्या हातून कोणाचेही वाईट होणार नाही, इतकी काळजी प्रत्येकाने घेतली, तर सारा समाज सुखी होईल. समृद्धीची शिखरे सर करतानाच परस्परांशी स्नेहाने जोडले जाणे, हेच खऱ्याअर्थाने नव्या वर्षाचे यश ठरेल. मावळत्या वर्षाने कृत्रिम बुद्धिमत्ता नावाचा जादुई जिन येणाऱ्या काळात कोणकोणते कारनामे दाखवणार आहे, याची झलक दाखवली आहे. या नव्या कालखंडात तंत्रज्ञानाचा वापर केवळ चरितार्थासाठी न होता तो तुटलेली मने जोडण्यासाठी व्हावा, ही काळाची गरज आहे. आपण 'स्मार्ट' उपकरणांच्या विळख्यात इतके अडकलो आहोत की, समोर बसलेल्या माणसाशी डोळ्यांत बघून बोलण्यापेक्षा हातातील मोबाईलवर चॅटिंग करण्यात आपल्याला अधिक धन्यता वाटते. ही आभासी दुनिया आपल्याला तात्पुरता आनंद देऊ शकते; पण संकटाच्या वेळी उभा राहणारा खांदा हा रक्ताच्या आणि प्रेमाच्या माणसांचाच असतो. त्यामुळे या वर्षात किमान जेवताना तरी मोबाईल बाजूला ठेवून एकमेकांच्या सुख-दुःखाच्या गोष्टी ऐकण्याचा संकल्प प्रत्येकाने केला, तर घरातील संवाद पुन्हा जिवंत होईल आणि विस्कळीत होत चाललेली कुटुंबव्यवस्था पुन्हा बळकट होईल. पैसा आणि यशाची मृगजळे आपल्याला पळवत ठेवतात; पण त्या धावपळीत घराच्या उंबरठ्यावर आपली वाट पाहणाऱ्या त्या थकलेल्या डोळ्यांतील आर्जव आपण वाचायला विसरतो आहोत. नव्या वर्षाच्या पहाटेला केवळ शुभेच्छांचा ओघ नसावा, तर तो आपल्या माणसांच्या कुशीत विसावल्याचा एक सुखाचा उसासा असावा. ज्या दिवशी आपल्या यशाचा आनंद वाटून घेण्यासाठी आपल्याकडे आपली हक्काची माणसं असतील, त्या दिवशी खऱ्याअर्थानं आयुष्यात वसंत फुलला असं समजायला हरकत नाही. आयुष्याच्या वाटेवर चालताना आपली ओंजळ रिकामी राहू नये, याची काळजी निसर्गच घेत असतो.*

---

# 'सुपर वूल्फ मून'ने उजळणार रात्र!

**३ जानेवारी २०२६ रोजी वर्षातील पहिले पौर्णिमेचे चंद्रदर्शन घडणार आहे, या दिवशी वर्षातील पहिला सुपरमून असेल. तो इतर पौर्णिमेपेक्षा खूप मोठा असेल. याला वुल्फ मून असेही म्हणतात.**



### 'वूल्फ मून' हे नाव कसे पडले?

- या पौर्णिमेला 'वूल्फ मून' म्हणण्यामागे प्राचीन अमेरिकन आणि युरोपीय परंपरांचा संदर्भ आहे. जानेवारी महिना हा कडाक्याची थंडी आणि अन्नाच्या टंचाईचा काळ असतो. या काळात अन्नाच्या शोधात असलेले लांडगे गावांच्या बाहेर येऊन मोठ्याने ओरडत असत. त्यांच्या या ओरडण्यावरूनच जानेवारीतील पौर्णिमेला 'वूल्फ मून' असे नाव पडले.
- स्वच्छ आकाश असल्यास, दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई आणि बंगळूरु यांसारख्या शहरांसह संपूर्ण देशभरात हे विहंगम दृश्य दिसेल. उत्तर भारतात, थंड हिवाळ्याची हवा आणि स्वच्छ आकाशामुळे दृश्य अधिक स्पष्ट दिसण्याची शक्यता आहे, तर दक्षिण भारतात, संध्याकाळी पूर्वेकडील आकाशात चंद्र उगवताना तो लक्षणीयरीत्या मोठा दिसेल

- **भारतीय प्रमाणवेळेनुसार ३ जानेवारी रोजी दुपारी ३:३३ वाजता चंद्र पूर्णत्वास पोहोचेल. मात्र, भारतात याचे खरे विलोभनीय रूप सूर्यास्तानंतर, म्हणजेच चंद्रोदयाच्या वेळी पाहायला मिळेल. २ आणि ३ जानेवारीच्या संध्याकाळी चंद्र पूर्व क्षितिजावर नेहमीपेक्षा थोडा खाली दिसेल. यामुळे उगवणारा चंद्र आकाराने मोठा, अधिक सोनेरी आणि पृथ्वीच्या अगदी जवळ असल्यासारखा वाटतो. भारतात संध्याकाळी ६ ते ७ च्या सुमारास हा सुपरमून दिसू लागेल आणि रात्रभर आकाशात प्रकाशमान असेल.**

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

नववर्ष २०२६ ची एका विलोभनीय खगोलीय घटनेने होणार आहे. ३ जानेवारी २०२६ रोजी वर्षातील पहिले पौर्णिमेचे चंद्रदर्शन घडणार आहे. या दिवशी वर्षातील पहिला सुपरमून असेल. तो इतर पौर्णिमेपेक्षा खूप मोठा असेल. याला वुल्फ मून असेही म्हणतात. विशेष म्हणजे, या दिवशी चंद्र पृथ्वीच्या अत्यंत जवळ येणार असल्याने तो 'सुपरमून'च्या रूपात अवकाशात तळपताना दिसेल. स्वच्छ आकाश असल्यास संपूर्ण देशभरात हे विहंगम दृश्य दिसेल.

हा केवळ २०२६ चा पहिलाच पूर्ण चंद्र नसेल, तर वर्षातील सर्वात मोठा आणि तेजस्वी चंद्र असणार आहे. या दिवशी चंद्र त्याच्या कक्षेतील पृथ्वीपासूनच्या सर्वात जवळच्या बिंदूवर असेल. त्यामुळे तो सामान्य पौर्णिमेच्या चंद्रापेक्षा साधारण १४% मोठा आणि ३०% अधिक तेजस्वी दिसेल.

जेव्हा पौर्णिमा आणि चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळच्या बिंदूवर असतो, तेव्हा सुपरमून होतो. ३ जानेवारी २०२६ रोजी चंद्र पृथ्वीपासून केवळ ३,५६,८०० किलोमीटर अंतरावर असेल. हे सरासरी अंतरापेक्षा सुमारे १० टक्क्यांनी कमी आहे. २०२६ मध्ये दिसणाऱ्या ३ ते ४ सुपरमूनपैकी हा पहिला सुपरमून असेल.

---

# ८ ग्रा.पं. सदस्यांचे सामूहिक राजीनामे

## चिखलगाव ग्रामपंचायतीत 'नूतन' वर्षात राजकीय भूकंप; '

**▸विदर्भ केसरी। वणी / प्रतिनिधी**

वणी तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या चिखलगाव ग्रामपंचायतीत नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. ग्रामपंचायतीच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात 'हुकूमशाही' सुरू असल्याचा गंभीर आरोप करत तब्बल ८ सदस्यांनी सामूहिकरीत्या गटविकास अधिकाऱ्यांकडे आपले राजीनामे सादर केल्याने तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. या सामूहिक राजीनाम्यामुळे सरपंच आणि उपसरपंच यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, गावातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राजीनामा देणाऱ्या सदस्यांमध्ये संतोष राजुरकर, अतुल चांदेकर, पंकज मोरे, हरिश्चंद्र कारेकर, सुधीर ठेंगणे, अर्चना वानखेडे, सुचिता भगत आणि माया माते यांचा समावेश आहे. या सदस्यांनी प्रशासनाला दिलेल्या पत्रात ग्रामपंचायतीच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, ग्रामपंचायतीच्या मासिक सभा किंवा अन्य बैठकांचे प्रोसिडिंग रीतसर लेखी स्वरूपात न लिहिता, सदस्यांवर कोऱ्या कागदावर सह्या करण्यासाठी वारंवार दबाव टाकला जातो. लोकशाही मार्गाने चालणाऱ्या या संस्थेत सदस्यांच्या मताला किंमत उरली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याशिवाय, गावातील बांधकामांच्या बाबतीत सदस्यांनी दिलेल्या सूचनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. अनेक विकासकामे ही नियमबाह्य पद्धतीने रेटली जात असून, ग्रामपंचायतीतून देयके अदा करताना कोणत्याही सदस्याला विश्वासात घेतले जात नाही. धक्कादायक बाब म्हणजे, सरपंच व उपसरपंच हे स्वतःच्या मालकीच्या ले-आऊटमधील कामे परस्पर ठराव करून मंजूर करून घेतात, मात्र इतर भागातील विकासकामे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवतात, असा दावा राजीनामा दिलेल्या सदस्यांनी केला आहे. या सर्व प्रकारामुळे गावातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सुटण्याऐवजी वाढतच आहेत आणि विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. या संपूर्ण प्रकरणावर सरपंच रुपाली कातकडे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

> **प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, सदस्यांचे राजीनामे अद्याप मंजूर करण्यात आलेले नाहीत आणि आम्ही या सर्व सदस्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार आहोत. चिखलगाव ग्रामपंचायतीत सरपंच, उपसरपंच आणि सदस्य मिळून एकूण १८ जणांची बॉडी आहे. त्यापैकी निम्म्याच्या जवळपास सदस्यांनी एकाच वेळी राजीनामा अस्त्र उपसल्यामुळे चिखलगावच्या राजकारणाला आता कोणती नवी कलाटणी मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

---

# शिवसेना शिंदे गटाची 'बिनविरोध हॅट्रिक

**▸विदर्भ केसरी।**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय समीकरणे वेगाने बदलत असतानाच, जळगाव महानगरपालिकेत शिवसेना शिंदे गट आणि महायुतीने आपले वर्चस्व निर्माण केले आहे. प्रभाग 9 'ब' मधून प्रतिभा देशमुख यांची बिनविरोध निवड झाल्याने जळगाव महापालिकेत शिंदे गटाने 'बिनविरोध हॅट्रिक' साधली असून एकाच दिवसात पक्षाचे तीन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या विजयामुळे महापालिकेबाहेर कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला असून, आतापर्यंत जळगावमध्ये महायुतीचे एकूण चार नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.

जळगाव महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गट आणि महायुतीने आपले वर्चस्व राखत 'बिनविरोध विजयाची हॅट्रिक' साधली असून, प्रभाग 9 'ब' मधून एकमेव अपक्ष उमेदवाराने माघार घेतल्यामुळे प्रतिभा गजानन देशमुख यांची बिनविरोध निवड झाली आहे. आज एकाच दिवशी शिंदे गटाचे तीन उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची राजकीय ताकद अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या ऐतिहासिक यशानंतर उत्साही कार्यकर्त्यांनी महानगरपालिकेबाहेर फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत मोठा जल्लोष साजरा केला.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचा पहिला गुलाल!

## रवी लांडगे सलग दुसऱ्यांदा बिनविरोध; अजित पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का

**▸विदर्भ केसरी।**



राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध निवडींच्या बाबतीत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या महायुतीने आपली पकड घट्ट केली असून, यामध्ये भाजपचे सर्वाधिक उमेदवार विजयी ठरले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर भाजपच्या खात्यात आता 12 व्या बिनविरोध उमेदवाराची भर पडली असून, पिंपरी-चिंचवडमधील भोसरी मतदारसंघाच्या प्रभाग 6 'ब' मधून रवी लांडगे यांची बिनविरोध निवड झाली आहे. या वाढत्या आकड्यामुळे निवडणुकीच्या प्रत्यक्ष मतदानापूर्वीच महायुतीने राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यास सुरुवात केल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भाजपने विजयाचे खाते उघडले असून रवी लांडगे सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आले आहेत. 2017 च्या निवडणुकीत जेव्हा भाजपने राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मोडीत काढला होता, तेव्हाही रवी लांडगे यांनीच पक्षाचा पहिला विजय नोंदवला होता आणि आता पुन्हा एकदा त्यांनी त्याच इतिहासाची पुनरावृत्ती केली आहे. प्रभाग 6 'ब' मधील या विजयाची आता केवळ अधिकृत घोषणा बाकी असून, या यशामुळे आमदार महेश लांडगे यांच्यासह भाजप समर्थकांनी पिंपरी-चिंचवडमध्ये जल्लोष साजरा केला आहे.

या विजयाचा मार्ग प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या अर्ज बाद होण्याने आणि माघारीने सुकर झाला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार निलेश सूर्यवंशी यांचा ओबीसी दाखला अवैध ठरल्याने त्यांचा अर्ज बाद झाला, त्यानंतर रिंगणात असलेल्या अपक्ष उमेदवार श्रद्धा लांडगे आणि प्रसाद ताठे यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. विशेष म्हणजे, अपक्ष उमेदवार प्रसाद ताठे यांनी आपल्यावर कोणताही दबाव नसून, केवळ प्रभागाच्या विकासासाठी आणि रवी भाऊंच्या विचारांना पाठिंबा देण्यासाठी आपण माघार घेत आहोत, असे स्पष्ट केल्याने रवी लांडगे यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले.

---

# हिंगणघाट नगरपालिकेत उपनगराध्यक्ष पदावर निर्णायक नेतृत्वाची चर्चा

## आमदार समीर कुणावार यांच्या निर्णयाकडे शहराचे लक्ष



### हिंगणघाटच्या विकासासाठी निर्णायक पाऊल

- **नवीन टीम, नवीन नेतृत्व आणि स्वच्छ प्रतिमेचा विश्वासार्ह नगरसेवक या महत्त्वाच्या भूमिकेत संधी मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. आमदार समीर कुणावार यांच्या सूक्ष्मदृष्टी, तडफदार आणि पारदर्शक नेतृत्वाखाली उपनगराध्यक्ष पदासह नगरपालिका समित्यांमध्ये शहरहिताचे निर्णय होतील, असा नागरिकांचा विश्वास असून हिंगणघाटच्या विकासासाठी हे एक निर्णायक पाऊल ठरेल, यात शंका नाही.**

**▸विदर्भ केसरी। हिंगणघाट :**

नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. नयना उमेश तुळसकर यांनी नुकताच पदभार स्वीकारल्यानंतर आता उपनगराध्यक्ष पदाची राजकीय हालचाल वेगाने सुरू झाली आहे. या शर्यतीत एका वरिष्ठ नगरसेवकासह काही 'पाण्यातील रत्न' समजल्या जाणाऱ्या, परंतु पडद्यामागे हालचाली करणाऱ्या संभाव्य उमेदवारांनीही प्रयत्न सुरू केल्याने या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

शहराच्या विकासाचा वेग आणि गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी उपनगराध्यक्ष व विविध समित्यांची रचना ही अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार समीर कुणावार हे नगरपालिकेतील निर्णायक नेतृत्व म्हणून योग्य, पारदर्शक आणि परिणामकारक निर्णय घेतील, अशी ठाम चर्चा शहरात आहे.

विकासाभिमुख धोरण, शंभर टक्के परिणामकारक कामकाज आणि संतुलित नेतृत्व हीच या निवडीची प्रमुख कसोटी असणार असल्याचे बोलले जात आहे.

---

# मूर्तिजापूरच्या विकासाचा नवा अध्याय

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात : खासदार अनुप धोत्रे, आमदार हरीश पिंपळे यांच्यासह दिग्गज नेत्यांची उपस्थिती.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



मूर्तीजापूर नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षपदी विराजमान झालेले हर्षल रेखा रामेश्वर साबळे यांचा पदग्रहण सोहळा आज गुरुवारी मोठ्या उत्साहात आणि मंगलमयी वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याच्या निमित्ताने मूर्तीजापूर शहरात भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला असून, शहराच्या विकासाची नवी सूत्रे आता तरुण नेतृत्वाच्या हाती सोपवण्यात आली आहेत.

नगरपरिषद कार्यालय परिसरात आयोजित या भव्य सोहळ्याला राजकीय क्षेत्रातील दिग्गज नेत्यांनी उपस्थिती दर्शवून नवनिर्वाचित नगराध्यक्षांना प्रमुख नेत्यांची मांदियाळी या कार्यक्रमाला अकोला लोकसभा क्षेत्राचे खासदार अनुप संजय धोत्रे, मूर्तीजापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार मा. हरिश मारोतीआप्पा पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, आमदार वसंत खंडेलवाल, माजी आमदार बळीराम सिरस्कर,भाजपा जिल्हाध्यक्ष अकोला ग्रामीण संतोषदादा शिवरकर, मूर्तिजापूर भाजपाचे पदाधिकारी, नंदकिशोर राऊत,प्रदिप ठाकरे, अविनाश यावले रितेश साबाजकर,यांनीही यावेळी उपस्थित राहून हर्षल साबळे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मूर्तिजापूर नगरपरिषदेत निवडून आलेल्या २५ नगरसेवकांचांही यावेळी आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी पदग्रहण सोहळा चे यजमान नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी आपल्या पदभार स्वीकारल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना नगराध्यक्ष हर्षल साबळे भावूक झाले. ते म्हणाले की, "मूर्तीजापूरच्या जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मी कटिबद्ध असून, सर्वांच्या आशीर्वादाने आणि सोबतीने मूर्तीजापूरला प्रगतीपथावर नेण्याचा माझा मानस आहे.

नगराध्यक्षांच्या पदग्रहण सोहळ्यासाठी मूर्तीजापूर शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

पिण्याचे पाणी, रस्ते आणि स्वच्छता या मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

भाजपचा शक्तिप्रदर्शन, या निमित्ताने भाजपच्या स्थानिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत आगामी काळातील विकासकामांसाठी एकीचे बळ दाखवले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर ठाकरे यांनी केले व आभार राजकुमार नाचणे यांनी मानले. या सोहळ्यामुळे मूर्तीजापूर शहरात आनंदाचे वातावरण असून, एका सुशिक्षित आणि तरुण नगराध्यक्षाच्या रूपाने शहराला नवी दिशा मिळेल, अशी आशा सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,
Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629



## सावळी सदोबा येथे अवैध दारूची विक्री

आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा परिसरात अवैध दारू विक्रेत्यांची संख्या वाढली असून, अनेक गावांत खुलेआम हातभट्टी दारूची विक्री होत आहे. मागील अनेक महिन्यांपासून दारू विक्रीचा गोरखधंदा बिनधास्त सुरू असतानाही पोलिसांना याची साधी भनकही लागू नये, याबाबत परिसरात आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. सावली सदोबा या ग्रामीण परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे तसेच रस्त्यालगतच्या पुलांचे बांधकाम सुरू आहे.

## संक्षिप्त...

### युवा ग्रामीण पत्रकार संघ ढाणकी अध्यक्षपदी गजानन चंद्रकांत आजेगावकर

**▸विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी: -- मिलिंद चिकटे**




कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात ढाणकी युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये युवा ग्रामीण पत्रकार संघाची २०२६ - २७ ची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे मावळते अध्यक्ष शेख इरफान शेख गुलाब यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांच्या अध्यक्षते खाली नवीन कार्यकारिणीचे गठन करण्यात आले असून युवा ग्रामीण पत्रकार संघ पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी गजानन चंद्रकांत आजेगावकर, उपाध्यक्षपदी शेख शाहरूख शेख आलम तर सचिवपदी शेख इरफान शेख गुलाब यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. , यांची अविरोध निवड करण्यात आली. यावेळी सदस्य म्हणून मिलींद चिकाटे, बन्टी फूलकोडवार, प्रशांत आरेवाड, राजू गोपेवाड, , उपस्थित होते.

### एस एल फाउंडेशन तर्फे श्रमसंस्कार पुरस्कारानिमीत्त 'चँरिटी शो'

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ (प्रतिनिधी)**

दाते काँलेजमधील माजी विद्यार्थ्यांचे संघटन असलेल्या एस एल फाउंडेशन तर्फे रविवार दि. ४ जानेवारी २०२६ ला सकाळी १० वाजता चँरिटी शो आणि ५ व्या श्रमसंस्कार पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. इलिमेंन्ट्स मॉल आणि सुरुची लॉन येथे सकाळी होत असलेल्या सोहळ्याचे उद्घाटन जगप्रसिद्ध शेफ विष्णुजी मनोहर करणार आहेत. जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री किशोर दर्डा अध्यक्षस्थानी राहणार असुन मुख्य अतिथी म्हणुन सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुळकर्णी यांची उपस्थिती असणार आहेत. यावेळी मंचावर अँड रुचिर कुळकर्णी, पुणे, वाणिज्य ट्रस्टचे अध्यक्ष श्री विनायकराव दाते आणि सत्कारमुर्ती म्हणुन घाटंजीचे सामाजिक कार्यकर्ते श्री सुरज हेमके यांची उपस्थिती असणार आहे. शाल, श्रीफळ, पाच हजार रोख, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यावेळी जागतिक ब्रेल लिपी दिनानिमीत्त अंध विद्यार्थ्यांना दोन ब्रेल लिपी सेट तसेच आम्ही साऱ्या सावित्री मधील विद्यार्थीनींना उपयोगी साहित्याचे वितरण होणार आहे. चँरिटी शो अंतर्गत ईलिमेंन्ट्स मॉलच्या थिएटरमधील तीन स्क्रीनवर स्फुरणदायी चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या कार्यक्रमातच एस एल फाउंडेशनच्या 'निरामय' या आरोग्यसेवा उपक्रमाचा श्रीगणेशा होणार आहे.
या सेवा उपक्रमाला यवतमाळातील सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

### तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना राज्य कार्यकारीणी पंचवार्षीक निवडणुक ३ व ४ जानेवारी रोजी

**▸विदर्भ केसरी। बाभूळगाव**

सुधारित घटना दुरुस्ती - २०२५ नुसार महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना राज्य कार्यकारिणी पंचवार्षिक निवडणूक - २०२६ हॉटेल निसर्ग, सुरवडी ता. फलटण जि.सातारा येथे ३ जानेवारी (शनिवार) व ४ जानेवारी (रविवार ) रोजी पार पाडणार आहे दिनांक २९ जानेवारी २०२० रोजी संस्थापक राज्याध्यक्ष नितीन धामणे (वैजापूर, छत्रपती संभाजीनगर) यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेची स्थापना करण्यात आली होती सध्या राज्यात १८४०० ग्रामपंचायत अधिकारी संवर्ग कार्यरत आहे यापैकी ५५०० ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी या संघटनेचे प्राथमिक सदस्यत्व स्वीकारले असून आज रोजी ३५०० पेक्षा जास्त सक्रिय सभासद कार्यरत आहेत या संघटनेने १५ जिल्ह्यात सभासद जोडले असून विस्तार कार्य सातत्याने व जोमाने सुरू आहे संघटनेच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचा अत्यंत जिव्हाळ्याचा व आर्थिक दृष्टीने महत्त्वाचा एक पद निर्मिती, न्यायालय निकालावर आधारित वेतन त्रुटी दूर करणे , गृह बांधणी कर्ज अग्रिम मंजूर करणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अधिसूचना, जाहिरात व निवड प्रक्रिया झालेल्या संवर्गास जुनी पेन्शन लागू करणे , इत्यादी प्रश्न प्राधान्याने सोडविले आहेत संघटनेमार्फत मंत्रालयीन पातळीवर संवर्गांचा कंत्राटी कालावधी सेवा ज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरणे, कायम प्रवास भत्ता वाढ करणे , डिपार्टमेंटल कामे, सेवा प्रवेश नियम दुरुस्ती, शैक्षणिक अहर्ता पदवी करणे, गणनिहाय विस्तार अधिकारी संख्या वाढविणे, ११ ते २० वर्ष सेवा वेतन असमानता दूर करणे,अतिरिक्त कामाचा ताण कमी करणे, ग्रामसभा संख्येवर नियंत्रण आणणे, अतिउत्कृष्ट सेवा प्राप्त संवर्गास आगाऊ वेतन वाढ मिळविणे, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार निवडीचे निकष व मूल्यमापन बदल, महिला बालकल्याण अधिकारी व सहाय्यक गटविकास अधिकारी ( वर्ग - २) परीक्षेस बसण्यास परवानगी, घरकुल योजना अंमलबजावणी सुधारणा या रास्त मागण्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे

# ...तर इच्छा मरणाची परवानगी द्या

## गुरुदेवची मागणी : नगर परिषदेत बोगस अनुकंपाधारकांनी लाटल्या नोकऱ्या

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ : सर्वसामान्यांची संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुरुदेव युवा संघाकडून नगर परिषदेतील गैरप्रकारांना चव्हाट्यावर आणण्यात आले.याची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने चौकशी समिती नेमण्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र गैरप्रकाराची चौकशी करणारी ही समिती गेली कुठे असा सवाल गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम यांनी जिल्हा प्रशासनाला विचारला आहे. ज्या बोगस अनुकंपाधारकांनी नोकऱ्या लाटल्या अशांवर फौजदारी कारवाई करावी,अशी मागणीदेखील करण्यात आली.

नगर परिषदेत बेकायदेशीर अनुकंपा भरती, जम्पिंग प्रमोशन, डिजिटल शाळा प्रकल्पातील दोन कोटींचा घोटाळा, किरकोळ साहित्य विनानिविदा विक्री यांसारख्या गंभीर बाबी गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम यांनी प्रशासनापुढे आणल्या आहे.त्यानुसार या प्रकरणाची चौकशी व्हावी,अशी माफक अपेक्षा गेडाम यांची आहे. परंतु, या प्रकरणात केवळ कागदपत्रे इकडल्या तिकडे करण्यातच प्रशासन पुढे आहे.प्रत्यक्षात चौकशी समिती बेपत्ता आहे. चौकशीसाठी आवश्यक नियुक्ती आदेश, सेवा पुस्तिका, वैद्यकीय प्रमाणपत्रे, उपस्थिती पत्रके, शासकीय निर्णय, डिजिटल शाळेसंबंधी कागदपत्रे समितीकडे उपलब्ध नसून महत्वाची कागदपत्रे गहाळ होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.एकंदरीत ही चौकशी प्रक्रिया केवळ कागदोपत्री सुरू असल्याचा आरोपही गेडाम यांनी केला आहे.त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेऊन विभागीय आयुक्त यांनी दिनांक ५ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी विकास मीना यांना चौकशी समिती गठीत करून संबंधित प्रकरणी अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. मात्र, सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला तरीदेखील समिती गठीत न झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्याकडून चौकशी संदर्भातील कागदपत्रे सादर करण्यात आले नसल्याने संशयाला अधिक वाव मिळण्याची चिन्हे आहेत. जर न्याय मिळत नसेल तर जिल्हा प्रशासनाने इच्छा मरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी गेडाम यांनी निवेदनाद्वारे विभागीय आयुक्त श्वेता सिंगल यांना मागितली आहे.

### दोषी अधिकाऱ्यांना प्रशासनाने घातले पाठीशी

**■ विभागीय आयुक्तांच्या आदेशानंतरही जिल्हाधिकारी चौकशी समिती का गठीत करू शकत नाहीत का? मुख्याधिकारी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष का करीत आहे असे प्रश्न गुरुदेव युवा संघाचे गेडाम यांनी उपस्थित केले.सर्व प्रकरणातील पुरावे सादर केल्यानंतर दोषींवर आजतागायत कारवाई न झाल्याने दोषी अधिकाऱ्यांना दस्तरखुद्द प्रशासन संरक्षण देत असल्याचा संशय व्यक्त केल्या जात आहे. अनुकंपा भरतीतील अनियमिततेविषयी बरेच प्रश्न उपस्थित होत आहेत. सुनील नाईक यांचे वडील पेन्शनवर असताना त्यांचे नातेवाईक अनुकंपाधारक कसे? याशिवाय या यादीत सूरज पाखरे यांचे नाव असल्याचे नमूद करून त्याबाबतचे ठोस पुरावे देण्यात आल्याचा दावा मनोज गेडाम यांनी केला.तरीदेखील प्रशासन मूग गिळून गप्प आहे,असा आरोप गेडाम यांनी केला आहे.**

## नेर येथेही तलाठ्यांचे धरणे आंदोलन

**▸विदर्भ केसरी। नेर**

ग्राममहसूल अधिकारी (तलाठी) संवर्गाच्या प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्यांकडे प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ विदर्भ पटवारी संघाने बुधवारी तहसील कार्यालयाच्या परिसरात एकदिवसीय धरणे आंदोलन केले. गेल्या अनेक वर्षापासून विविध मागण्यांसाठी १० ते १२ वेळा निवेदने सादर करूनही कोणतीही ठोस दखल घेतली नसल्याने हे आंदोलन छेडण्यात आले. आंदोलनात तलाठी संवर्गाच्या मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये गेल्या पंधरा वर्षापासून अद्ययावत न झालेली एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तत्काळ सुधारित करणे, जिल्ह्यातील तलाठी संवर्गाला मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देणे, कालबाह्य ठरलेले लॅपटॉप व प्रिंटर बदलवून नवीन साधने उपलब्ध करून देणे, ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या विनंतीनुसार बदली प्रक्रिया पूर्ण करणे, अतिवृष्टी व दुष्काळ अनुदान वाटपासाठी खर्च मंजूर करणे, तलाठी कार्यालयांना नियमानुसार भाडे मिळणे, वार्षिक मूल्यांकन अहवालाची प्रत देणे, ग्राम महसूल अधिकारी यांची वेतननिश्चिती करणे, आदींचा समावेश होता.

# विदर्भ संघाचे धरणे आंदोलन



**▸विदर्भ केसरी।**

जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षित व आडमुठ्या धोरणामुळे यवतमाळ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. आपल्या प्रलंबित व न्याय्य मागण्यांसाठी विदर्भ पटवारी संघाच्या वतीने बुधवारी, ३१ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांसमोर एक दिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात आले.

जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या आर्थिक व सेवाविषयक मागण्यांबाबत आतापर्यंत १० ते १२ निवेदने सादर करण्यात आली आहेत. तलाठी संवर्गाची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी गेल्या १५ वर्षांपासून अद्यावत करण्यात आलेली नाही. तसेच मंडळ अधिकारी पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठ्यांना पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी आहे. कालबाह्य झालेले लॅपटॉप व प्रिंटर बदलून देणे, वेतन निश्चिती करण्यात यावी, सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीचा अतिरिक्त प्रभार देऊ नये. आदिवासी प्रोत्साहनपर भत्ता मंजूर करावा, अशा विविध मागण्यांचाही समावेश आहे. या सर्व मागण्यांचे सविस्तर निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांना देण्यात आले. यावेळी विदर्भ पटवारी संघाचे जिल्हाध्यक्ष भरत पिसे, सचिव चेतन ठाकरे, परिमल डोळसकर, सुनील उराडे, प्रकाश कानडे यांच्यासह मोठ्या संख्येने तलाठी उपस्थित होते. प्रशासनानी दखल घ्यावी आंदोलनाचा भाग म्हणून जिल्ह्यातील सर्व तलाठ्यांनी डू-डीएससी टोकन्स प्रशासनाकडे जमा केली. प्रशासनाने यापुढेही केवळ आश्वासनांचीच भूमिका घेतल्यास ६ जानेवारीपासून बेमुदत रजा आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशारा विदर्भ पटवारी संघाने दिला आहे.

# नविन वर्षाचे स्वागत दूध वाटप करून

## अस्तित्व फाउंडेशनचा तरुण पिढीला मोलाचा सल्ला.



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

नववर्षाच्या स्वागताला तरुणाईने दारू ऐवजी दूध पिऊन सेलिब्रेशन करण्याचा उपक्रम यवतमाळात राबविण्यात आला. अस्तित्व फाउंडेशन आणि महिलांच्या विविध संस्था संघटनानी एकत्र येतं 'दारू नको दूध प्या' हा उपक्रम थर्टी फर्स्ट ला रात्री 12 पर्यंत राबविला. वर्दळीच्या दत्त चौकात शंभर लिटर दुध नागरिकांना वितरित करण्यात आले.

### आयुष्य उद्ध्वस्थ करु नका

सगळीकडे मोठ्या उत्साहात थर्टी फर्स्ट सेलिब्रेशन केले जाते. यावेळी अनेकांकडून दारू पिण्यास पसंती दिली जाते, परंतु दारूचा एक प्याला पुढे संपूर्ण आयुष्य उध्वस्त करू शकतो, त्यामुळे 'दारू नको तर दूध प्या' जीवनाचा आनंद घ्या' म्हणत यवतमाळकरांनी या उपक्रमाला प्रतिसाद देत, नव्या वर्षात व्यसनमुक्तीचा संकल्प देखील केला. या उपक्रमात अस्तित्व फाउंडेशनच्या अध्यक्षा अल्का कोथळे, कविता अरुण भोयर, स्मिता डहाके, सारीका ताजने, अश्विनी कारलेकर, मालती गावंडे, श्रुती कोथळे आदिनी सहभाग घेतला.

## महामार्गावरुन शहरामध्ये प्रवेशासाठी 2026 मध्ये होणार तीन नवे उड्डाणपूल

**▸विदर्भ केसरी।**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने बुटीबोरी - तुळजापुर महामार्ग तयार करण्यात आला. यामुळे यवतमाळ-नागपुरमधील अंतर जलदगतीने पार करणे शक्य झाले आहे. मात्र महामार्गावरुन यवतमाळ शहरामध्ये प्रवेश करण्यासाठी दिलेली पद्धत अत्यंत चुकीची होती. त्यामुळे महामार्गावरुन यवतमाळला येणारे अनेक नागरिक पुढे निघुन जात होते. या चुकीच्या पद्धतीमुळे अनेक अपघातही घडत होते. यासंदर्भात वारंवार मागणी झाल्यानंतर तत्कालीन आमदार मदन येरावार यांच्या पाठपुराव्यामुळे महामार्गावरुन शहरात प्रवेश करण्याच्या ठिकाणी तीन नवे उड्डाणपुल मंजूर करण्यात आले. त्यासाठी राष्ट्रीय रस्ते निधीमधून प्रत्येक उड्डाणपुलासाठी ९९ कोटी याप्रमाणे ३ उड्डाणपुलासाठी तब्बल २९७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्या निधीतून दोन उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यात एक उड्डाणपुल नागपुर मार्गावरील चारचाकी वाहनाच्या शोरुमसमोर होत आहे. तर दुसरा उड्डाणपुल ओव्ही आर्णी मार्गावरील वनवासी मारोती मंदिराच्या जवळ तयार होत आहे. या दोन्ही उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. २०२६ मध्ये दोन्ही उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले होणार असल्याने वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे. एक उड्डाणपूल प्रलंबित शहरामध्ये या उड्डाणपुलाच्या खाली प्रवेश करण्यासाठी सुरक्षित रस्ते उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे अपघात तर कमी होतील. सोबतच रस्त्याने येणाऱ्या नवख्या प्रवाशांना शहरामध्ये प्रवेशाचा मार्ग सुकर होणार आहे.

# बौद्धांचा सांस्कृतिक इतिहास तपासण्यासाठी फूले आंबेडकरांची दृष्टी असणे गरजेचे : शेगावकर

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



आंबेडकरी साहित्य व कला अकादमी च्या वतीने बुधवार दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्धांचा सांस्कृतिक इतिहास ,या विषयावर बोलताना महेंद्र शेगावकर प्राचीन बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक अकोला यांनी बौद्ध संस्कृतीची इथंबूत माहिती ही दिल्या गेलेली आहे. बौद्ध संस्कृती मधून ज्या ज्या गोष्टी इतर धर्मांने सुद्धा स्वीकारल्या त्याचही परिमार्जन त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये केलं .ईश्वराच्या भोवती फेरी मारणे हा प्रकार स्तूपाच्या भोवती फेरी मारण्याच्या प्रक्रियेतून आला. बौद्ध संस्कृतीचे जे लेखक आहेत यांची संपूर्ण माहिती महेंद्र शेगावकर यांनी याप्रसंगी मांडली. गाथा ,थेरी गाथा त्रिपिटक,त्रिशरण , पंचशील बाबासाहेब आंबेडकरांच्या 22 प्रतिज्ञा याच सुंदर विश्लेषण त्यांनी आपल्या व्याख्यानातून केलं. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका तपासात असताना बौद्धांचा सांस्कृतिक इतिहास हा सर्वांनी तपासला पाहिजे ,आपल्या सोबत आपण इतरांनाही सांगितला पाहिजे. जागतिक दर्जाचे तत्त्वज्ञान हे बौद्धांच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये निर्माण झालेल आहे. या तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करणारी यंत्रणा नव्या पिढीने स्वीकारली पाहिजे .अशा पद्धतीचे मनोगत सुद्धा त्यांनी व्यक्त केलं. अध्यक्ष माननीय शुद्धोधन कांबळे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था भंडारा यांनी भुषवले. ते बोलताना म्हणाले की नव्या पिढीने आता बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची भूमिका बजावणे फार महत्त्वाचे आहे. त्यातूनच सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकते .याप्रसंगी इंजिनीयर गुलाबराव घेवंदे, ओमप्रकाश नगराळे अशोकराव वानखेडे, नंदकुमार रामटेके, डॉक्टर अरुण जनबंधू ,इंजिनिअर राहुल भरणे, इंजिनिअर दीपक नगराळे ,इंजिनिअर घनश्याम भारशंकर ,माननीय सिद्धार्थ भवरे हे होते .कार्यक्रमाची भूमिका डॉक्टर सुभाष जमदाडे यांनी मांडली .परिचय गोपीचंद कांबळे यांनी करून दिला, संचलन सुनील वासनिक यांनी केले .प्रास्ताविक कडूजी नगराळे यांनी मांडले याप्रसंगी. निवडून आलेले स्मृती परवाच्या संस्थापकापैकी एक एडवोकेट आनंद गायकवाड, डॉक्टर नीरज वाघमारे. मीराताई वीर मॅडम यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन इंजिनिअर संजय मानकर, नवनीत महाजन ,सतीश राणा प्राध्यापक डॉक्टर संदीप नगराळे, डॉक्टर साहेबराव कदम, प्राध्यापक विलास भवरे ,इंजिनियर भीमराव गायकवाड ,सुमेध ठमके ,आनंद धवणे ,विलास वानखडे ,इंजिनीयर राजेंद्र लभाने, इंजिनिअर निलेश सोनटक्के यांनी केले .कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणात यवतमाळकर जनता उपस्थित होती. सुरुवातीला घनश्याम पाटील आणि संच यांनी आदरांजली पर गीत गायनाचा कार्यक्रम केला .नऊ दिवस चाललेल्या या कार्यक्रमांमध्ये समन्वयक म्हणून डॉक्टर ज्ञानेश्वर गोरे ,डॉक्टर विलास काळे, प्राचार्य सलीम चव्हाण ,प्रवक्ता म्हणून प्राध्यापक वसीम खान, प्रा. सविता हजारे, प्रसिद्धी प्रमुख म्हणून प्रा., काशिनाथ लाहोरे सोशल मीडिया प्रमुख म्हणून शुभांगी मालखेडे सुषमा पाटील मॅडम यांनी काम पाहले. तर कार्यक्रम नवही दिवसाच्या यशस्वी करण्याकरता इंजिनीयर दीपक नगराळे, अंकुश वाकडे, रियाज सिद्दिकी ,सुनिता काळे ,मायाताई गोरे ,सिंधुताई धवणे ,संजय मडावी यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केलं.

### अप्पर पोलीस अधीक्षकांचे रक्तदान तर स्वच्छता व क्रीडा स्पर्धांनी रंगला सोहळा

# यवतमाळात 'महाराष्ट्र होमगार्ड दिन' उत्साहात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




यवतमाळ जिल्हा होमगार्ड पथका कडुन 79 वा महाराष्ट्र होमगार्ड वर्धापन दिन सप्ताह मोठ्या उत्साहात मध्ये साजरा करण्यात आला. यावेळी मा.अशोक थोरात साहेब अप्पर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक.यांनी होमगार्ड वर्धापन दिनाचे औचित्य साधून मा अशोक थोरात साहेब यांनी रक्तदान करून सर्वांना होमगार्ड दिनाच्या शुभेच्छा दिल्या 79 वा महाराष्ट्र होमगार्ड वर्धापन दिनाचा कार्यक्रम जिल्हा प्रशिक्षण केंद्र यवतमाळ वाघाडी येथे करण्यात आला. असून येथे यावेळी पुरुष होमगार्ड यांचे उजळणी प्रशिक्षण ची समारोप सुद्धा करण्यात आला.मा अशोक थोरात साहेब अप्पर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक. यांच्या आदेशाने तथा राजेंद्र बनसोड केंद्रनायक यांच्या मार्गदर्शनाखाली होमगार्ड वर्धापन दिन सप्ताह गेल्या सात दिवसापासून विविध कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये रक्तदान शिबिर .स्वच्छता अभियान. कबड्डी. हॉलीबॉल.सांस्कृतिक कार्यक्रम विविध कार्यक्रम घेण्यात आले. 79वा होमगार्ड वर्धापन दिन सप्ताह राबविण्यात आला

या यावेळी तत्कालीन प्रधानमंत्री होमगार्ड संघटनेचे जनक मोरारजीभाई देसाई यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली .यावेळी प्रणिता चव्हाण यांचे बीड येथे पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा राजेंद्र बनसोड केंद्रनायक यांच्या हस्ते शाल. श्रीफळ. देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र बनसोड केंद्रनायक. तसेच प्रमुख पाहुणे सत्कारमूर्ती प्रणिता चव्हाण.आणि प्रमुख मान्यवर उपस्थिती मध्ये जीवराज गुरूनुले पलटण नायक यवतमाळ.निरंजन मलकापूर समादेशक अधिकारी यवतमाळ. अन्सार खान समादेशक पांढरकवडा. ए आर खान समादेशक अधिकारी दारव्हा. कैलास बिडकर समादेशक वणी.संतोष देवकर समादेशक अधिकारी पुसद.ईमरान शेख. प्रदीप नाकतोडे.निरज राऊत प ना.अजित मुधळकर.वसंता लोंढे प ना दारव्हा.अब्दुल नईम प ना दारव्हा.मंगेश पिंपळकर प वणी. दिनेश खडसे प ना यवतमाळ.सुरज मडावी पांढरकवडा.सविता मोरड प ना.शोभा झांबरे प ना.खुशी केराम प ना.सुभाष घुमणर 79 वा महाराष्ट्र होमगार्ड वर्धापन दिन सप्ताह कार्यक्रम च प्रास्ताविक निरंजन मलकापूर समादेशक यवतमाळ. यांनी केलं तर सूत्रसंचालन आंसर खान समादेशक पांढरकवडा यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी निरंजन मलकापूर समादेशक यवतमाळ यांनी अथक परिश्रम कार्यक्रम यशस्वी केला. यवतमाळ पथकातील मोठ्या प्रमाणात पुरुष होमगार्ड व महिला होमगार्ड यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून परिश्रम घेऊन हा कार्यक्रम चांगल्या पार पाडला असून या कार्यक्रमाचे कौतुक होत आहे.

### (महाराष्ट्र होमगार्ड दिनाचे वैशिष्ट

- **मा अशोक थोरात अप्पर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक यांनी रक्तदान केले!**
- **प्रणिता चव्हाण यांचा सत्कार!**
- **स्वच्छता अभियान राबविली!**
- **कबड्डी व हॉलीबॉल खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले!)**

## तरुण शेतकरी सुमित घोमचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी।**



अचलपूर तालुक्यातील हनवतखेडा येथील तरुण शेतकरी आणि परतवाडा शहरातील श्री डिजिटल हबचे संचालक सुमित प्रकाश घोम यांचा बुधवारी सायंकाळी दुचाकी अपघातात मृत्यू झाला. हा अपघात परतवाडा-अंजनगाव मार्गावर घडला, ज्यात आणखी दोन युवक जखमी झाले आहेत.

३१ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास परतवाडा-अंजनगाव मार्गावरील पेट्रोल पंपाजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. एमएच २७ बीएल ६२४६ आणि एमएच २७ डी ३६८१ या क्रमांकाच्या दुचाकी या अपघातात सामील होत्या. अपघातानंतर तिघांनाही रुग्णालयात नेण्यात आले, मात्र सुमित घोम यांचा वाटेतच प्राणज्योत मालवली.

या अपघातात दुसऱ्या दुचाकीवरील एक युवक गंभीर जखमी झाला असून, त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर करण्यात आले आहे. अन्य एकाला किरकोळ दुखापत झाली आहे. हे दोघेही अंजनगाव तालुक्यातील असल्याचे समजते, मात्र त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही.

सुमित घोम हे महानुभाव पंथाचे अनुयायी होते आणि गावात तसेच परिवारात सर्वांना मदत करणारे, तसेच युवकांसाठी प्रेरणादायी व्यावसायिक म्हणून ओळखले जात होते. ते बहुतांश वेळा चारचाकी वाहनाचा वापर करत असले तरी, अपघाताच्या दिवशी ते दुचाकीने परतवाडा जात होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त होत आहे.

## अबब... धान उत्पादकांचे ४१९ कोटी प्रलंबित?



■ गोंदिया, आधीच नैसर्गिक संकटाला तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांना आता आर्थिक संकटाला तोंड देण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या ५११५९ शेतकऱ्यांचे तब्बल ४१९ कोटींची रक्कम प्रलंबित असल्याची बाब जिल्हा पणन कार्यालयाच्या धान खरेदी अहवालावरून पुढे आली आहे.

## संक्षिप्त...

### गंगाखेड तालुक्यात दोन गटांत तुंबळ हाणामारी

▸विदर्भ केसरी। गंगाखेड :

तालुक्यातील इरळद येथील देवईमाय मठ येथे बुधवारी जत्रा होती. सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास दोन लहान मुलाच्या भांडणाचा वाद विकोपाला गेला. त्यानंतर दोन्ही गटातील माणसांनी लाठ्या, काठ्या, दगडानी एकमेकास तुंबळ हाणामारीस सुरुवात केली. या मारहाणीत दोघेजण गंभीर जखमी झाले. सदरील भांडण पेटण्याच्या मार्गावर असताना पोलिसांनी सौम्य बळाचा वापर केला. त्यानंतर दोन्ही गटातील एकुण ३३ जणांवर पोलिसांनी गुरुवारी गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहे. सरत्या वर्षाच्या अखेरच्या दिवशी इरळद येथे दोन गटांत तुंबळ मारामारीची घटना घडल्याने परीसरात भितीचे वातावरण पसरले होते. देवईमाय मठ इरळद येथे जत्रा होती. या जत्रेत दोन लहान मुलांच्या किरकोळ भांडणाचे रूपांतर मोठ्या माणसात तुंबळ हाणामारीत झाले. मंदिराच्या पाण्याच्या टाकीजवळ ३३ जणानी हातात काठ्या, दगड घेत एकमेकांना बेदम मारहाण सुरू केली. हे भांडण अधिक आक्रमक होत असल्याचे लक्षात येताच पोलीसानी सौम्य बळाचा वापर करून जमावाला पांगवले. या घटनेत दोन गंभीर जखमी झाले असून त्यांना उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले आहे. यावेळी रूग्णालयात नागरीकांचा मोठा जमाव जमला होता. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक यांनी फिर्याद दिली असून दोन्ही गटातील एकुण ३३ जणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यात काशिनाथ मुलगीर, देवराव मुलगीर, चंद्रकांत ढेरे, बाबलु ढेरे, भैया ढेरे, भागवत गाडवे, संदिप तुरनर,अजय राऊत, डिंगाबर गाडवे, मुजा कुबने, राघोजी खजे, भानुदास जाधव, देविदास मुलगीर, निवृत्ती निळे, हनुमंत वाटोळे, रखमाजी सदगे,अरविंद मुलगीर,ज्ञानोबा मुलगीर,गोविद मुलगीर, गोटू वाघमारे, आदीत्य मुलगीर, हनुमान वाटोळे, विजय काळे, योगेश काळे, आदित्य काळे, अरूण पवार, बळी काळे,कोब्राजी पवार, विशाल काळे, गणेश काळे, नितीन काळे, ढोल्या पवार, आकश पवार सर्व राहणार इरळद, नरदळद यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत.

### सहा नगरसेवक बिनविरोध विजयी

▸विदर्भ केसरी। मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असले तरी भाजपने आत्ताच आपले खाते उघडले आहे. कल्याण-डोंबिवली, धुळे, पनवेल येथील भाजपचे सहा नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत. कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत भाजपने आपले खाते उघडले आहे. प्रभाग अ मधून रेखा राजन चौधरी निवडून आल्या आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेने याठिकाणी उमेदवार दिला नव्हता. रेखा चौधरी यांच्या विरोधात एकही उमेदवारी अर्ज न आल्याने त्या बिनविरोध निवडून आल्या आहेत. डोंबिवलीतील प्रभाग क्रमांक २६ क मधून आसावरी नवरे आणि २६ ब मधून रंजना पेणकर असे तीन नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत. धुळे महापालिकेतही दोन नगरसेविकांची बिनविरोध निवड झाली आहे. प्रभाग क्रमांक १ मधील भाजपच्या उमेदवार उज्ज्वला रणजीत राजे भोसले यांची बिनविरोध निवड झाली. प्रतिस्पर्धी विरोधातले उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने उज्ज्वला भोसले या बिनविरोध निवडून आल्या. धुळे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक सहा ब मधून भाजपच्या ज्योत्स्ना प्रफुल पाटील बिनविरोध निवड झाली आहे. विरोधात उमेदवारी अर्ज नसल्याने ज्योत्स्ना पाटील यांचा बिनविरोध विजय झाला आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपच्या दोन जागा बिनविरोध झाल्या आहेत. पनवेल महापालिका निवडणुकीमध्ये भाजपचा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. शेकापच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने प्रभाग क्रमांक १८ मधून नितीन पाटील बिनविरोध निवडून आले आहेत. शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार रोहन गावंड यांचा अर्ज छाननीत बाद झाल्याने नितीन पाटील विजयी झाले.

### काल पक्षात आले, लगेच मिळाली उमेदवारी

▸विदर्भ केसरी। मुंबई :

उद्धवसेना-मनसे युती, काँग्रेस-वंचित आघाडी, भाजप-शिंदेसेना युती



तर राष्ट्रवादीची (अजित पवार) स्वतंत्र लढत अशा बदलत्या राजकीय समीकरणांमुळे अनेकांनी उमेदवारीसाठी पक्षांतराचा मार्ग स्वीकारला आहे. विशेष म्हणजे पक्षप्रवेश करताच काहींना थेट उमेदवारी देण्यात आल्याने पक्षांतर्गत असंतोष वाढला आहे. उद्धवसेना-मनसे युतीमध्ये १९२ प्रभाग मनसेला गेला. येथून मनसेने यशवंत किल्लेदार यांना उमेदवारी दिल्याने पक्षाच्या सरचिटणीस स्नेहल जाधव व उद्धवसेनेचे माजी नगरसेवक प्रकाश पाटणकर यांनी रात्री उशिरा शिंदेसेनेत प्रवेश केला. पाटणकर यांच्या पत्नी प्रीती पाटणकर यांना शिंदेसेनेने उमेदवारी दिल्याने विधानसभा प्रमुख कुणाल वाडेकर नाराज झाले. पक्षासाठी झटणाऱ्या वाडेकरांना डावलण्यात आल्याने कार्यकर्त्यांनी वेगळी भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे. शिवडीतील उद्धवसेनेचे माजी नगरसेवक अनिल कोकीळ यांना प्रभाग २०४ मधून उमेदवारी न मिळाल्याने शिंदेसेनेत प्रवेश करून लगेच उमेदवारी मिळविली.

# BMC मध्ये १० हजार २३१ मतदान केंद्र

## १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार बजावणार हक्क; प्रशासन महापालिका निवडणुकीसाठी सज्ज

▸विदर्भ केसरी। मुंबई




बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी महानगरपालिका प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. लोकशाहीच्या या महत्त्वाच्या प्रक्रियेत प्रत्येक मतदाराला मतदानाचा हक्क सुलभपणे बजावता यावा, यासाठी महानगरपालिका आणि निवडणूक यंत्रणेने सूक्ष्म नियोजन केले आहे. या निवडणुकीत एकूण १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यांच्यासाठी विविध ठिकाणी मिळून एकूण १० हजार २३१ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये शाळा, महाविद्यालयांसह शासकीय / निमशासकीय इमारती, सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच खासगी इमारतींचा समावेश आहे. प्रत्येक प्रभागातील लोकसंख्या, मतदारांची संख्या आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन मतदान केंद्रांची आखणी करण्यात आली आहे, अशी माहिती महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिली आहे.

महानगरपालिका आयुक्त गगराणी म्हणाले की, बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या निवडणूक विभागामार्फत माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या नियम व तरतुदींचे पालन करून तयार केलेली २२७ प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखत मतदारांना सुलभ आणि सुरक्षित मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मतदान केंद्र अंतिम यादी तयार करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरसोय होऊ नये, यासाठी मतदारांनी आपले संबंधित मतदान केंद्र कोणते आहे, याची आधीच खात्री करून घ्यावी. मतदान प्रक्रियेत सुलभता, पारदर्शकता आणि मतदारांना सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### कुठे अन् किती मतदान केंद्र?

■ मतदान केंद्रांची विगतवारी लक्षात घेता, एकूण १० हजार २३१ मतदान केंद्रे विविध प्रकारच्या इमारती व जागांमध्ये उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी ४ हजार ३८६ मतदान केंद्रे शासकीय / निमशासकीय इमारतींमध्ये स्थापन करण्यात येत आहेत. यामध्ये २ हजार ३८७ मतदान केंद्रे बंदिस्त जागांमध्ये, ८८० मतदान केंद्रे अर्धबंदिस्त जागांमध्ये, तर १ हजार १११९ मतदान केंद्रे खुल्या जागांमध्ये राहणार आहेत. तसेच, सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये एकूण ७०२ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. यापैकी १८१ मतदान केंद्रे बंदिस्त जागांमध्ये, ३१२ मतदान केंद्रे अर्धबंदिस्त जागांमध्ये, तर २०९ मतदान केंद्रे खुल्या जागांमध्ये स्थापन केली जाणार आहेत. याशिवाय, खासगी इमारतींमध्ये एकूण ५ हजार १४३ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यामध्ये २ हजार ७१० मतदान केंद्रे बंदिस्त जागांमध्ये, १ हजार ३७८ मतदान केंद्रे अर्धबंदिस्त जागांमध्ये, तसेच १ हजार ५५ मतदान केंद्रे खुल्या जागांमध्ये असतील.


### १० हजार २३१ मतदान केंद्र

■ बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मतदारांना मतदान करण्यासाठी सात परिमंडळांतील २४ प्रशासकीय विभाग कार्यालयानुसार तसेच २३ मध्यवर्ती मतदान केंद्रानुसार एकूण १० हजार २३१ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रियेत कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर वीज पुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसाधनगृहे, रॅम्प आदींची सुविधा करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्याची पाहणी, पडताळणी केली आहे. मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी मतदान केंद्रानजीक 'मतदार सहाय्य केंद्र' स्थापित करण्यात येणार आहेत. मतदान केंद्रांवर मतदारांना माहिती देणारे फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एकंदरीतच, मतदान प्रक्रिया सुरळीत, सुरक्षित व सोयीस्कर पार पडावी यासाठी विविध ठिकाणी आणि विविध स्वरूपाच्या जागांमध्ये मतदान केंद्रांची व्यापक व सुनियोजित व्यवस्था करण्यात आली आहे, असे देखील श्री. गगराणी यांनी नमूद केले.

# निवडणुकीसाठी अपक्षांना पाव, वाटाणे अन् अक्रोड अशी १९४ मुक्त चिन्हे

### ,'रिक्षा' चिन्हाची मोठी मागणी

▸विदर्भ केसरी। मालेगाव



महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने अपक्ष उमेदवारांसाठी १९४ मुक्त निवडणूक चिन्हांचा समावेश आहे. या यादीत सफरचंद, बिस्कीट, पाव, केक, ढोबळी मिरची यांसह विविध खाद्यपदार्थांची, तसेच कृषी उत्पादनांशी निगडित चिन्हांचा समावेश आहे.

फुलकोबी, नारळ, ऊस, आले, द्राक्ष, हिरवी मिरची, फणस, भेंडी, मका, भुईमूग, वाटाणे, पेरू, अननस, कलिंगड, अक्रोड, जेवणाची थाळी अशी अनेक चिन्हें अपक्ष उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

निवडणूक लढविणाऱ्या अपक्ष उमेदवारांना तसेच अमान्यताप्राप्त (नोंदणीकृत) राजकीय पक्षांच्या उमेदवारांना या मुक्त चिन्हांमधून चिन्ह निवडता येणार आहे. चिन्हवाटपाची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार आहे. येत्या २ जानेवारी २०२६ रोजी अर्ज माघारीनंतर आणि त्यानंतर ३ जानेवारीला निवडणूक चिन्हांचे वाटप स्पष्ट होणार आहे.

■ इस्लाम पक्षासाठी ऑटोरिक्षा हे चिन्ह मिळावे, अशी मागणी माजी आमदार आसीफ शेख यांनी मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्त रवींद्र जाधव यांच्याकडे केली आहे. अपक्ष उमेदवारांना अर्ज भरताना किमान तीन मुक्त चिन्हांचा अग्रक्रम देणे बंधनकारक असून पक्षाच्या उमेदवारांनी पहिल्या क्रमांकावर 'रिक्षा' चिन्हाची निवड केल्याचे त्यांनी नमूद केले. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्या राखीव चिन्हांवरच उमेदवार उभे करण्याची मुभा आहे. मुक्त चिन्हांची यादी त्यांना लागू होत नाही. राष्ट्रीय पातळीवरील ५, राज्यस्तरीय ५ आणि इतर राज्यांतील ९ असे एकूण १९ पक्षांची चिन्हे राखीव ठेवण्यात आली आहेत. राज्य निवडणूक आयोगाकडे अमान्यताप्राप्त; पण नोंदणीकृत ४१६ राजकीय पक्षांची नोंद आहे.

# नांदेड मनपा निवडणूक अर्ज छाननीत ५९ उमेदवार बाद; ८७८ अर्ज वैध

▸विदर्भ केसरी। नांदेड:

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ३१ डिसेंबर रोजी पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत तब्बल ५९ नामनिर्देशन पत्र विविध कारणावरून बाद ठरली आहेत. महापालिकेच्या ८१ जागांसाठी आता ८७८ उमेदवार रिंगणात असून अर्ज माघारीनंतर नेमके किती जण निवडणूक लढवणार हे स्पष्ट होईल.

महापालिकेसाठी एकूण सात निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये थाटले असून दि.२३ डिसेंबर ते ३० डिसेंबर या कालावधीत ३ हजार ७१५ अर्जांची उचल करण्यात आली होती. प्रारंभिक पाच दिवसात केवळ ३८ अर्ज दाखल झाले होते. २९ डिसेंबर रोजी २६५ तर ३० डिसेंबर रोजी अंतिम तारखेस तब्बल ९०१ अर्ज निवडणूक विभागाकडे प्राप्त झाले होते. एकूण १२०३ नामनिर्देशन पत्रांची छाननी प्रक्रिया विविध कार्यालयात ३१ डिसेंबर रोजी दिवसभर पार पडली. त्यात एकूण ९३७उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ८७८ अर्ज वैध ठरले.

**अधिकृत एबी फॉर्म जोडलेल्यांचीही मनधरणी**

ज्यांना उमेदवारी मिळाली नाही अशा अनेकांनी दुसऱ्या पक्षाचा आधार घेत एबी फॉर्म जोडले आहेत. त्यांची ही बंडखोरी रोखण्यासाठी आणि त्यांनी माघार घ्यावी, यासाठी पक्षश्रेष्ठींकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. तसेच ज्यांना ज्यांना उमेदवारी मिळाली नाही, अशा नाराजांची नाराजी दूर करत त्यांना पक्षाच्या कार्यकारिणीत विविध पदावर नियुक्त्या दिल्या जात आहेत.

■ नगरपालिका निवडणुकीत नव्यानेच स्थापन झालेल्या मराठवाडा जनहित पार्टीने धर्माबाद, बिलोलीमध्ये चांगले यश मिळवले. तर भोकरमध्ये चार जागा मिळविल्या आहेत. हाच बिलोली पॅटर्न आता नांदेड महापालिकेतही राबविला जात असल्याचे दिसत आहे. काँग्रेसच्या माजी नगरसेवकांना भाजपकडून उमेदवारी मिळाली नाही अथवा ज्यांनी घेतली नाही, अशा बहुतांश जणांनी मराठवाडा जनहित पार्टीचा आधार घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने माजी महापौर त्रिशला धबाले यांचे पती विलास धबाले यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांनी मराठवाडा जनहित पार्टीकडून उमेदवारी दाखल केली असून त्यांचे नामनिर्देशन पत्र छाननीअंती वैध ठरले आहेत.

# वनरक्षकाची बनावट नियुक्तिपत्रे बनवून तरुणांची फसवणूक करणारी टोळी

▸विदर्भ केसरी। रामटेक :

वनविभागातील वनरक्षक पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून काही तरुणांना लाखो रुपयांनी फसविल्याचा प्रकार नुकताच उघड झाला आहे. रामटेक पोलिसांनी फसवणूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील तिघांना अटक केली असून, एक जण फरार आहे.

आरोपींनी तरुणांना प्रत्येकी किमान १२ लाख रुपयांची मागणी करीत त्यांच्याकडून १ लाख ५० हजार रुपये ते २ लाख रुपये स्वीकारल्याचे तसेच त्या तरुणांना वनरक्षकपदाचे बनावट नियुक्तिपत्र दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गजानन नामदेव कानडे, रा. पुसद, जिल्हा यवतमाळ, विलास जाधव, रा. अमरावती आणि अंकित पानतावणे, रा. नागपूर अशी अटक करण्यात आलेल्या तर पिंटू वाळके असे फरार आरोपीचे नाव आहे. पवन जनार्दन काठोळे (२६, रा. मेहकर, जिल्हा बुलढाणा) याची काही दिवसांपूर्वी गजानन कानडे याच्याशी ओळख झाली. आपण खतविक्री एजंट असून, आपली वनविभागात ओळख असल्याचे पवनला सांगत नागपूर विभागात वनरक्षकपदी नोकरी लावून देण्याची बतावणी केली. त्यासाठी त्याने पवनला १२ लाख रुपयांची मागणी केली. नोकरी मिळण्याच्या आशेपोटी पवनने त्याच्यावर विश्वास ठेवला आणि १ लाख ५० हजार रुपये दिले. एवढेच नव्हे तर उषा मस्के नामक तरुणीने गजाननला नोकरीसाठी २ लाख ३० हजार रुपये दिले.

# मुर्तिजापूर रेल्वे स्थानकावर डिझेल वॅगनला आग

## रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.

▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर

मुर्तिजापूर रेल्वे स्थानकावर आज दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास एका डिझेलने भरलेल्या वॅगनला अचानक आग लागल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली. सुदैवाने, रेल्वे कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आगीवर तातडीने नियंत्रण मिळवण्यात यश आले, ज्यामुळे शहरावर ओढवू शकणारे एक मोठे संकट टळले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज दुपारी ३:३० च्या सुमारास रेल्वे स्थानकाच्या परिसरात उभ्या असलेल्या डिझेल मालगाडीच्या एका वॅगनमधून धूर आणि आगीच्या ज्वाळा निघताना दिसल्या. डिझेलने भरलेली गाडी असल्याने आगीचा भडका उडण्याची भीती निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्टेशनवरील रेल्वे कर्मचाऱ्यांनी धाव घेत अग्निशमन उपकरणांच्या मदतीने आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. शहरावरील मोठे संकट टळले रेल्वे स्थानकाचा परिसर लोकवस्तीला लागून असल्याने ही आग पसरली असती किंवा वॅगनचा स्फोट झाला असता, तर मुर्तिजापूर शहरात मोठी जीवितहानी आणि वित्तहानी झाली असती. मात्र, कर्मचाऱ्यांनी जीवाची पर्वा न करता वेळीच केलेल्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. प्रशासनाचे मौन आणि संभ्रम



आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. विशेष म्हणजे, एवढी मोठी घटना घडूनही रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावर अधिकृत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे शॉर्ट सर्किटमुळे आग लागली की अन्य काही तांत्रिक बिघाड होता, याबाबत सध्या तरी संभ्रम कायम आहे.

### सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

■ ज्वलंत पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वॅगनला आग लागल्याने रेल्वेच्या सुरक्षा यंत्रणेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अशा संवेदनशील मालगाड्यांची तपासणी नियमितपणे केली जाते का ? असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. आता लक्ष चौकशीकडे या प्रकरणाची रेल्वे विभागाकडून सखोल चौकशी होणार का? आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासन कोणती ठोस भूमिका घेणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**सरत्या वर्षाला स्वच्छतेची सलामी**; वाडेगावात युवकांनी स्मशानभूमीत राबविले स्वच्छता अभियान

# स्वखर्चाने स्मशानभूमीत स्वच्छता अभियान!

▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर

बाळापूर : स्मशानभूमी परिसरात स्वखर्चाने स्वच्छता अभियान राबविण्यात आले असल्याने नागरिकाकडून कौतुकास्पद प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत .बाळापुर तालुक्यातील वाडेगाव येथील नदी काठावरील नळ योजनेच्या विहिरीजवळील असलेल्या स्मशानभूमी परिसरात आजमितीला मोठ्या प्रमाणात गांजर गवतासह इतर काटेरी झाडे झुडपांचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात पसरले होते. परिणामी अंत्यविधीसाठी गेलेल्या नागरिकांना बसण्यासाठी



किंवा उभे राहण्यासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता. त्या अनुषंगाने वाडेगाव येथील छत्रपती संभाजी युवक मंडळ व समस्त गावकरी मंडळीच्या वतीने दिनांक 31 डिसेंबर रोजी स्मशानभूमी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यावेळी छत्रपती संभाजी युवक मंडळाचे कार्यकर्ते तसेच गावकरी मंडळींनी मोठ्या संख्येने राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात आपला सहभाग नोंदविला. तसेच स्वच्छता अभियान कामात ट्रॅक्टर मालकांनी आपल्या ट्रॅक्टरच्या साह्याने शक्य होईल तेवढी मदत केली. तर छत्रपती संभाजी युवक मंडळाकडून दरवर्षी संपणाऱ्या वर्षाअखेरीस स्मशानभूमी परिसर तसेच इतर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्याचा उपक्रम राबविण्यात येत असतो. स्मशानभूमी परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### ग्रामस्थांकडून कौतुकाचा वर्षाव

■ वर्षाच्या शेवटच्या दिवशी जिथे जग पार्ट्यांमध्ये मग्न होते, तिथे वाडेगावच्या या शिलेदारांनी स्मशानभूमी चकाचक केल्याने गावात समाधानाचे वातावरण आहे. "तरुणांनी दाखवलेला हा सामाजिक दृष्टिकोन आदर्शवत आहे," अशा प्रतिक्रिया वाडेगावकर व्यक्त करत आहेत.

# डॉ. विजय काळे निमंत्रित कवी

## अ. भा. मराठी साहित्य संमेलनात सहभागी होण्याचा बहुमान

▸विदर्भ केसरी। वाशीम

नवीन वर्षारंभाच्या पर्वावर सातारा येथे होत असलेल्या 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात येथील युवा कवी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय काळे विदर्भाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. डॉ. काळे निमंत्रितांच्या कविसंमेलनात आपली कविता सादर करणार आहेत. वाशीम येथील सशक्त युवा कवी डॉ. विजय दामोदर काळे यांची निमंत्रितांच्या कविसंमेलनामध्ये वर्णी लागली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आजपर्यंतच्या इतिहासात याआधी वाशीम जिल्ह्यातून पद्मश्री नामदेव कांबळे आणि बाबाराव मुसळे या दोन थोर साहित्यिकांनाच आतापर्यंत



निमंत्रण मिळालेले आहे. त्यांच्यानंतर निमंत्रित म्हणून डॉ. विजय काळे हे जिल्ह्यातील तिसरेच साहित्यिक ठरले आहेत. कविसंमेलनात सहभागी होण्यासाठी ते आज वाशीमहून रवाना झाले. शुक्रवार, दि. दोन जानेवारीला उद्घाटन सत्र आटोपल्यानंतर, दुपारी तीन वाजता होणाऱ्या निमंत्रितांच्या कविसंमेलनात डॉ. विजय काळे हे आपली कविता सादर करतील. व्यवसायाने अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी असलेल्या डॉ. विजय काळे यांनी आतापर्यंत अनेक कविसंमेलने गाजविलेली आहेत. साधे शब्द आणि काळजाला भिडणारा अर्थ हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. कवितेचे प्रभावी सादरीकरण करण्यात त्यांचा हातखंडा आहे.

■ वऱ्हाडच्या मातीतील संवेदनशील कवी असलेल्या डॉ. विजय काळे यांच्या कवितांना देशी धार आहे. त्यातील वक्रोक्ती आणि व्यंग, तिरकसपणा रसिकांना भावतो. कारूण्य आणि वास्तव या धाग्यांनी विणलेली काळे यांची कविता एक अस्वस्थ सत्य सांगते आणि रसिकांना व्याकूळ करते. अशा दमदार कवीला साताऱ्याचे निमंत्रण मिळाल्याने वाशीमच्या वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

दैनिक विदर्भ केसरी TODAY
विदर्भाचा मानबिंदू
चंद्रपूर
GOOD MORNING

## सेवानिवृत्त महिला अधिकाऱ्यावर लाच मागितल्याचा गुन्हा

पुण्यातील भूसंपादन कार्यालयात लाचखोरीचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. सुनावणी पूर्ण झालेल्या प्रकरणाच्या निकालाची प्रत देण्यासाठी एक लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी एका सेवानिवृत्त महिला अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पुण्यातील महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. आरोपी महिलेचे नाव सुनंदा अशोक वागसकर (वय ६१) असून, त्या उपजिल्हाधिकारी भूसंपादन कार्यालयात मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. सेवानिवृत्तीनंतर त्या कंत्राटी पद्धतीने सेवेत कार्यरत असल्याचे समोर आले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या तपासानंतर त्यांच्या विरोधात पुणे शहरातील बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील तक्रारदार ४१ वर्षीय शेतकरी असून, त्यांच्या मामेबहिणीच्या वडिलोपार्जित जमिनीच्या नोंदींबाबतचे प्रकरण उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सिद्धार्थ भंडारे यांच्या न्यायालयात सुरू होते. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर निकालाची अधिकृत प्रत देण्यासाठी आरोपी वागसकर यांनी तक्रारदाराकडे सुरुवातीला ५० हजार रुपयांची लाच मागितली होती. नंतर ही रक्कम वाढवून एक लाख रुपये करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.

### संक्षीप्त

## सेवानिवृत्त मुख्याध्यापिका पुष्पा श्रीकृष्ण भांडे यांचे निधन

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी



मुर्तीजापूर तालुक्यातील चिखली येथील जिल्हा परिषद शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती पुष्पा श्रीकृष्ण भांडे यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे भांडे परिवारासह शोककळा पसरली आहे.

श्रीमती पुष्पा भांडे यांनी प्रदीर्घ काळ शिक्षण क्षेत्रात आपली सेवा बजावली होती. जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापिका म्हणून काम करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. त्या अत्यंत मनमिळाऊ आणि शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुली,मुलगा संतोष श्रीकृष्ण भांडे, सून, नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल मुर्तीजापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार हरीश मारोतीआप्पा पिंपळे यांनी शोक व्यक्त केला असून.त्यांचा अंत्यसंस्कार शुक्रवार दिनांक २ जानेवारी रोजी त्यांच्या राहत्या घरून आदर्श कॉलणी येथून गणेश नगरच्या स्मशानभूमीत सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

# सोयाबीन खरेदी ग्रेडनुसार करण्याच्या मागणीसाठी निघणारा 'ट्रॅक्टर मोर्चा' स्थगित

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर निर्णय

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

मूर्तिजापूर : सोयाबीनची खरेदी कापसाप्रमाणेच 'ग्रेड'नुसार (दर्जानुसार) व्हावी या प्रमुख मागणीसाठी शुक्रवारी (२ जानेवारी) काढण्यात येणारा ट्रॅक्टर मोर्चा तूर्तास स्थगित करण्यात आला आहे. गुरुवारी प्रशासकीय पातळीवर झालेल्या तातडीच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्या केंद्राकडे पाठवण्याचे आश्वासन मिळाल्याने प्रगती शेतकरी मंडळ, जांभा खुर्दने हा निर्णय घेतला. नुकसानीमुळे शेतकरी आक्रमक यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनच्या दर्जावर मोठा परिणाम झाला आहे. नाफेडमार्फत सुरू असलेली खरेदी अत्यंत मंद गतीने होत असल्याने आणि खुल्या बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सुमारे एक हजार रुपयांचा फटका सोसावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रगती शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजू वानखडे यांनी 'सुपर एफ.ए.क्यू.' दर्जानुसार सोयाबीन खरेदीची पद्धत राबवण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला होता. २ जानेवारी रोजी शेतकऱ्यांनी सोयाबीन भरलेले ट्रॅक्टर घेऊन जुन्या कॉटन मार्केट यार्डवर धडक देण्याचे नियोजन केले होते. प्रशासकीय बैठकीत तोडगा शेतकऱ्यांचा रोष लक्षात घेता, १ जानेवारी रोजी तहसीलदार शिल्पा बोबडे यांच्या कार्यालयात तातडीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सहाय्यक निबंधक योगेश लोटे आणि खरेदी-विक्री व्यवस्थापक धीरज मुळे यांनी शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी केलेली मागणी रास्त असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ही मागणी तत्काळ केंद्र सरकारच्या दालनात पाठवली जाईल,असे आश्वासन प्रशासकीय अधिकाऱ्यांनी यावेळी दिले.




मोर्चा स्थगितीची घोषणा प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर, २ जानेवारीचा नियोजित मोर्चा स्थगित करण्यात येत असल्याचे राजू वानखडे यांनी जाहीर केले. या बैठकीला तहसीलदार शिल्पा बोबडे, शहर ठाणेदार अजित जाधव, तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे, योगेश लोटे, धीरज मुळे यांच्यासह शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष गुलाबराव म्हसाये, श्रीकृष्ण गुल्हाने, प्रमोद राजंदेकर, नंदकिशोर बबानिया, अभी पोळकट, श्रीकांत वानखडे, मुन्ना नाईकनवरे, अनिल देवगीरकर आणि कैलास साबळे आदी उपस्थित होते.











## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी पंचायत समिती देसाईगंज जिल्हा गडचिरोली

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : पंचायत समिती देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली अंतर्गत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी आदर्श इंग्लिश हायस्कूल देसाईगंज येथे दिनांक 29, 30 व 31 डिसेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी बक्षीस वितरण समारोह कार्यक्रम दिनांक 31 डिसेंबर 2025 ला आयोजित करण्यात आला होता. माध्यमिक:- प्रथम महात्मा गांधी विद्यालय वडसा, द्वितीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय वडसा, तृतीय आदर्श इंग्लिश हायस्कूल वडसा प्राथमिक:- जिल्हा परिषद शाळा कुरुड प्रथम, जिल्हा परिषद शाळा कोंढाळा द्वितीय महात्मा गांधी वडसा, तृतीय पारितोषिक वितरण करण्यात आले. समारंभाध्यक्ष मा. आमदार कृष्णाजी गजबे व बक्षीस वितरण मा. लताताई मुरलीधर सुंदरकर नगराध्यक्ष नगरपरिषद देसाईगंज, जगदीश शर्मा अध्यक्ष नूतन शिक्षण प्रसारण मंडळ देसाईगंज, मोतीलालजी कुकरेजा सचिव, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीराम गहाणे सर, नीलकंजी पोपटे, योगेशजी नाकतोडे, यशवंत टेंभुर्णे सर, एकनाथजी पिल्लारे, आनंद गुरनुले सर,ज्ञानेश्वर बांडे, अंबादास आमनेर सर, मुरलीधरजी सुंदरकर, नाकाडे मॅडम, उईके मॅडम, केडझरकर सर, तथा तालुकास्तरीय सर्व मुख्याध्यापक, शिक्षक वृंद विशेष शिक्षक आणि सर्व विषय साधन, व्यक्ती गट साधन केंद्र पंचायत समिती देसाईगंज व सर्व शालेय विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

# अहेरी विधानसभा क्षेत्रात 'अटल स्मृती संमेलन'

## मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांच्या अध्यक्षतेखाली प्रेरणादायी आयोजन

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

अहेरी :- भारतरत्न, माजी पंतप्रधान श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी अहेरी विधानसभा क्षेत्रातील शासकीय विश्रामगृह, आलापल्ली येथे अटल स्मृती संमेलन चे भव्य आयोजन करण्यात आले होते. दि. २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले हे संमेलन माजी खासदार तथा भारतीय जनता पार्टी अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अध्यक्षीय भाषणात मा. खा. डॉ. अशोकजी नेते यांनी श्रद्धेय अटलजींच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर तसेच त्यांच्या ऐतिहासिक राष्ट्रसेवेतील अमूल्य योगदानावर ओघवत्या व प्रेरणादायी शब्दांत प्रकाश टाकला. २५ डिसेंबर १९२४ रोजी ग्वाल्हेर येथे जन्मलेल्या अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, विद्यार्थी दशेपासूनच अटलजींना राष्ट्रसेवेची तीव्र ओढ होती. जनसंघापासून ते देशाच्या सर्वोच्च पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा त्याग, संघर्ष आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श आहे. अटलजी हे केवळ राजकारणी नव्हते, तर कवी, विचारवंत, कुशल वक्ते, संवेदनशील नेता आणि खरे राष्ट्रभक्त होते, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. अटलजींच्या स्मृतींचे विश्लेषण करताना मा.खा. डॉ. नेते म्हणाले, "अटलजी शरीराने आपल्यात नसले तरी त्यांच्या विचारांनी ते आजही आपल्या सोबत आहेत. त्यांच्या स्मृतींना शतशः नमन. सत्ता येते-जाते; मात्र राष्ट्रहित जोपासणे हेच खरे ध्येय असले पाहिजे. भारतीय जनता पार्टी हा सत्तेसाठीचा पक्ष नसून राष्ट्रसेवेचा यज्ञ आहे." यावेळी त्यांनी अटलजींच्या प्रसिद्ध ओळींचा उल्लेख करत त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाचे



विविध पैलू उलगडले—'न हार में, न जीत में, किंचित नहीं भयभीत मैं,संघर्ष पथ पर जो चले—यह भी सही, वह भी सही.' अटलजींचे विचार, त्यांची राष्ट्रवादाची दृष्टी आणि त्यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग हा आपल्या सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी राहील, असे मत मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांनी अध्यक्षीय निवेदनात व्यक्त केले. या कार्यक्रमास ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष बाबुरावजी कोहळे, जिल्हा महामंत्री प्रकाशजी गेडाम, नगरसेवक आशिषभाऊ पिपरे, जिल्हा उपाध्यक्ष विनोदजी आंकनपल्लीवार, जिल्हा सचिव सागर डेकाटे, बंगाली आघाडीचे नेते सुकमल हलदार, ज्येष्ठ नेते पोशालु चुधरी, युवा नेते अभिजित शेंडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अटलजींच्या विचारांना उजाळा देणारे हे 'अटल स्मृती संमेलन' उपस्थितांच्या मनावर दीर्घकाळ ठसा उमटवून गेले.

## अल्पवयीन मुलावर शस्त्राने वार

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे : कात्रज परिसरातील अंजनीनगर येथे पूर्ववैमनस्यातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या घटनेत मुलगा गंभीर जखमी झाला असून, खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका अल्पवयीनासह चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ऋषभ नावाचा १७ वर्षीय मुलगा या हल्ल्यात गंभीर जखमी झाला आहे. काही दिवसांपूर्वी ऋषभ आणि एका अल्पवयीन आरोपीमध्ये वाद झाला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

घटनेच्या दिवशी ऋषभ अंजनीनगर भागातून जात असताना आरोपी आणि त्याच्या साथीदारांनी त्याला गाठले. त्यांनी ऋषभवर धारदार शस्त्राने सपासप वार केले. यामुळे ऋषभ रक्तस्राव होऊन जमिनीवर पडला. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी ऋषभला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. आंबेगाव पोलीस ठाण्यात ऋषभने या प्रकरणी फिर्याद दिली असून, पोलीस उपनिरीक्षक फिरोज मुलाणी पुढील तपास करत आहेत.

## शहरासाठी नूतन वर्ष ठरो समृद्धी, विकास आणि नव्या पर्वाची सुरुवात

### नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे



गडचिरोली : नवीन वर्ष गडचिरोली शहरासाठी प्रगती, समृद्धी आणि सर्वांगीण विकासाचे नवे पर्व घेऊन येवो, अशा सदिच्छा गडचिरोली नगरपालिकेच्या नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर यांनी शहरवासीयांना दिल्या. नववर्षाच्या प्रारंभानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छा देताना गडचिरोलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक अपेक्षा व्यक्त केल्या. नगराध्यक्ष निंबोरकर म्हणाल्या की, "गडचिरोली शहराचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित न राहता शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, रोजगार आणि नागरिकांच्या जीवनमान उंचावणारा असावा. नवीन वर्षात शहराच्या विकासासाठी नव्या योजना, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि नागरिकांच्या सहकार्याने गडचिरोलीला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा संकल्प करण्यात येईल. त्यांनी गडचिरोलीतील तरुण, महिला, व्यापारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांनी शहराच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तसेच नवीन वर्ष सर्वांच्या आयुष्यात आनंद, आरोग्य, यश आणि समाधान घेऊन येवो, अशा शुभेच्छाही त्यांनी व्यक्त केल्या. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष प्रणोती सागर निंबोरकर यांच्या शुभेच्छांमुळे गडचिरोली शहरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, विकासाच्या नव्या वाटचालीसाठी आशावाद व्यक्त केला जात आहे.

# ऑफलाइन निविदा प्रक्रिया त्वरित रद्द करा

## नगरसेवकासह कंत्राटदार संघटनेची मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनातून केली मागणी

▶विदर्भ केसरी प्रतिनिधी
फुलचंद वाघाडे

कुरखेडा : १२/१२/२०२५ ला नगरपंचायत कार्यालय सादर केलेल्या तक्रारी अर्ज क्रमांक - 1995 वर अद्यापही कारवाई झालेली नाही ती कारवाई करून ऑफलाइन निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत आज कुरखेडा नगरपंचायतच्या अनेक नगरसेवकांनी व कंत्राटदार संघटना कुरखेडा येथील कंत्राकदाराने प्रभारी मुख्याधिकारी राजकुमार धनबाद यांना नगरत्थान महाअभियान योजना व नागरी दलितेतर बस्ती सुधार योजना सन २०२५ - २६ चे दिनांक - ३/११/२०२५ ला काढलेली निविदा सूचना ह्या बेकायदेशीर रित्या व नियमांना बगल देऊन काढण्यात आल्याने सदर निविदेतील चुका हेतू पुरस्कार केलेल्या आहेत हे आपल्या निदर्शनात आणून देऊन ती निविद्या प्रक्रिया रद्द करण्याबाबत तक्रार अर्ज सादर करण्यात आले होते व तसीच तक्रार जिल्हाधिकारी यांना नगर प्रशासकीय अधिकारी गडचिरोली यांच्यामार्फत करण्यात आली होती ती तक्रार जिल्हाधिकारी यांना दिनांक २४/ १२/ २०१५ सादर करण्यात आली होती परंतु त्या तक्रार अर्जाचे माननीय जिल्हाधिकारी गडचिरोली यास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने माननीय जिल्हाधिकारी यांनी यावर आपणास निविदा प्रक्रियेची कारवाई सखोल चौकशी करून त्यावर कारवाई करून तसा अहवाल सादर करण्याची कळवले सदर अहवाल आपण हेतू पुरस्कर निविदा प्रक्रिया कायदेशीर असल्याचे आपण वरिष्ठांना देण्यात आल्याचे आम्हास कडले आहे परंतु आपणास आम्ही झालेल्या निविदेची प्रक्रियेतील चुका आपणास निदर्शनास आणून दिल्या जसे की निविदा निविदा प्रक्रिया तीन स्थानिक जिल्ह्यातील वृत्तपत्रात अथवा जिल्हा पेजवर देणे आवश्यक होते ती फक्त एकाच वृत्तपत्रात दिली. तीही अमरावती जिल्हा पानावर दिल्याचे दिसून येत आहे.

दुसरी बाब सदर निविदा प्रक्रियेची कारवाई स्थानिक नगरपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर पारदर्शित करणे आवश्यक होते ती पण करण्यात आली नाही निविदा प्रक्रिया ऑफलाइन प्रक्रियेत करण्याचे आपण केले होते की ऑनलाईन प्रक्रिया करणे आवश्यक होते सदर निविदा



प्रक्रियेत फक्त तीनच कंत्राटदार यांनी निविदा फॉर्म भरल्याचे दिसून येत आहे ती चूक पण आपणास निदर्शनास आणून दिली सदर 23 विकास कामाचे निविदा प्रक्रियेत फक्त स्थानिक दोनच विशिष्ट कंत्राटरांचे हित लक्षात घेऊन बाहेर तालुक्यातील कंत्राटदारांना लाभ मिळवण्याचे दृष्टीने निविदा प्रक्रिया काही विशिष्ट पदाधिकारी व अधिकारी यांच्या संगनमताने आले असल्याचे आपणास निदर्शनात परस्वर स्थानिक कंत्राटदार व नगरपंचायत चे पदाधिकारी यांचे भेटीने व लिखित परंतु आपण कोणतेही सुचवलेल्या त्रुटी चुकीचे आहेत याची संबंधित चौकशी न करता काय विशिष्ट पदाधिकारी यांच्या दबावात जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या अहवालात तृत्या लपून पुनश्च निविदा प्रक्रिया राबवण्याचे दिसत आहे तरी पुनश्च्य आम्ही खाली सही करणारे नगरपंचायत चे पदाधिकारी व नगरसेवक व स्थानिक कंत्राटदार आपणास विनंतीपूर्वक निवेदन करत आहोत की वरील विषयाची अनुसंघाने कुणाच्याही दबावत न येता आपला निविदा प्रक्रिया त्वरित रद्द करण्यात यावी अन्यथा नगरसेवक व स्थानिक कंत्राटदार संघटनेचे सदस्य आपले कार्यालयात या आंदोलन करतील व कोणती अनुचित घटना घडल्यास आपले नगरपंचायत प्रशासन व आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद व सूचना घ्यावी असे निवेदन आज नगरसेवक तथा सभापती आशिष काळे सभापती नगरपंचायत कुरखेडा, अलकाताई गिरडकर नगरसेवक, एडवोकेट उमेश वालदे, नगरसेवक सागर निरंकारी, नगरसेवक रामभाऊ वैद्य, नगरसेविका दुर्गाताई गोटे, पुढे नगरसेवक रवींद्र गोटेफोडे, नगरसेविका कांताताई मते संघटनात तालुका कंत्राटदार संघटना अध्यक्ष जयंत हरडे, कंत्राटदार खुशाल बनसोड कंत्राटदार, मुजाहिद शेख कंत्राटदार मंगेश मांडवे कंत्राटदार, भावेश मुंगणकर ,कंत्राटदार रफिक याने निवेदनाच्या माध्यमातून इशारा दिला आहे.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY
गडचिरोली GOOD MORNING

## पुण्यात 'ट्रिपल सीट' हुल्लडबाजांचा राडा : वाहतूक पोलिसाचा फाडला गणवेश

पुण्यात सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा चौकात वाहतूक पोलिसाला मारहाण केल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. दंडात्मक कारवाई केल्याने संतप्त झालेल्या आरोपींनी पोलीस हवालदाराला मारहाण केली आणि त्यांच्या शासकीय कामात अडथळा आणला. याप्रकरणी लकी गौरव आनंद (वय २१), साहिल प्रकाश चिकणे आणि श्रावण रमेश हिरवे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस हवालदार राजेंद्र सेंगर यांनी नऱ्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सेंगर हे सिंहगड रस्ता वाहतूक शाखेत कार्यरत आहेत. आरोपी तिघे जण एकाच दुचाकीवरून प्रवास करत असताना, सेंगर यांनी त्यांना धायरी फाटा चौकात अडवले. ट्रिपल सीट प्रवास करत असल्याने सेंगर यांनी यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. यामुळे चिडलेल्या आरोपींनी सेंगर यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. या वादादरम्यान, आरोपी हिरवे याने सेंगर यांना चापट मारली. आरोपींनी आरडाओरडा करत त्यांचा गणवेश फाडला. शासकीय कामात अडथळा आणणे आणि मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत. पोलीस उपनिरीक्षक मालुसरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## संक्षीप्त



### ग्रामीण कबड्डीला नवे बळ; मरेगांवमध्ये भव्य पुरुष डे स्पर्धा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

मौशिखांब : जय सेवा नवयुवक क्रीडा मंडळ, मरेगांव यांच्या सौजन्याने भव्य ग्रामीण पुरुष डे कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेला परिसरातील कबड्डीप्रेमी व खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. स्पर्धेचे उद्घाटन 5जानेवारी 2026 रोजी होणार असून अंतिम सामन्या पर्यंत दिवशी खेळविण्यात येणार आहेत. ही स्पर्धा गंगाजी पाटील जत्रेच्या भव्य पटांगणावर, मरेगांव येथे पार पडत आहे. स्पर्धा गट 'अ' व गट 'ब' अशा दोन गटांत घेण्यात येत असून गट 'अ' मध्ये प्रथम पारितोषिक ₹30,000, द्वितीय ₹20,000 व तृतीय ₹15,000 तर गट 'ब' मध्ये प्रथम ₹25,000, द्वितीय ₹20,000 व तृतीय ₹10,000 अशी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रवेश फी व आयोजन शुल्क अत्यल्प ठेवल्यामुळे ग्रामीण संघांचा मोठा सहभाग दिसून येत आहे. शिस्तबद्ध सामने, अनुभवी पंचांची उपस्थिती व प्रेक्षकांची गर्दी यामुळे मैदानात कबड्डीचा थरार पाहायला मिळत आहे. या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील तरुण खेळाडूंना आपली कला सादर करण्याचे व्यासपीठ मिळाले असून कबड्डी खेळाला नवे बळ मिळत असल्याचे चित्र आहे. आयोजकांनी सर्व खेळाडू, पंच, कार्यकर्ते व क्रीडाप्रेमींचे आभार व्यक्त केले.




### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा येथील विद्यार्थी व शिक्षक प्रथम

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर शिक्षण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली शिक्षण विभाग व पंचायत समिती कुरखेडा अंतर्गतआयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी शासकीय आश्रम शाळा येंगलखेडा येथे आयोजित विज्ञान प्रदर्शनी मध्ये श्रीराम विद्यालय कुरखेडा व संस्कार पब्लिक स्कूल कुरखेडा येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्राचार्य नागेश्वर फाये यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला आहे सदर स्पर्धेत उच्च प्राथमिक गटातून जीविका राजेंद्रकुमार नेवारे हिने प्रथम क्रमांक पटकावला तर माध्यमिक गटातून विष्णू लक्ष्मण गायकवाड याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर शिक्षक विभागामधून विभाग मधू एस.बी. शिरपूरवार यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर संस्कार पब्लिक स्कूल येथील विद्यार्थी पारस झोडे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गटविकास अधिकारी धीरज पाटील गटशिक्षणाधिकारी नरेंद्र कुमार कोकुडे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आले आहे. या स्पर्धेचे गुण परीक्षक म्हणून महिला महाविद्यालय कुरखेडा येथील प्रा. नितीन घाटबांधे, प्रा. अमित मेश्राम, प्राध्यापिका विशाखा खुणे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले आहे. आज श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा येथील गुणवंत विद्यार्थी व शिक्षक यांचा प्राचार्य, नागेश्वर फाये, प्रा प्रदीप पाटणकर सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनोद नागपूरकर विज्ञान शिक्षिका हिना मुसानी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केला आहे . यावेळी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.



### सिकलसेल व्यक्तींचे दिव्यांग प्रमाणपत्र आणि UDID कार्ड काढण्या बाबत शिबिर संपन्न!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

धानोरा : दिनांक 30 डिसेंबर 2025 रोजी मा. सुहास गाडे सर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली , मा.डॉ. प्रताप शिंदे सर जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली, मा.डॉ. वर्षा लहाडे मॅडम जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय गडचिरोली यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच मा. श्री वानखेडे साहेब संवर्ग विकास अधिकारी (BDO)पं.स. धानोरा, मा. डॉ. गजभे सर वैद्यकीय अधीक्षक RH धानोरा, मा. डॉ. पंकज हेमके सर ता.आ.अधिकारी (THO) धानोरा यांच्या नियोजनाखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत सिकलसेल व्यक्तिंचे दिव्यांग प्रमाणपत्र आणि UDID कार्ड काढण्याबाबत शिबिराचा कार्यक्रम ग्रामीण रुग्णालय धानोरा येथे आयोजित करण्यात आला, सदर कॅम्प मधे 200 चे जवळपास सिकलसेल रुग्णाची रजिस्ट्रेशन करण्यात आले तज्ञ डॉक्टर यांच्या कडून तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र साठी रजिस्ट्रेशन करण्यात आले. रजिस्ट्रेशन करिता तालुक्यातील ग्राम पंचायत स्तरीय संगणक परिचालक यांनी विशेष प्रयत्न करून , संपूर्ण रुग्णांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले. पंचायत समिती धानोरा , तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय धानोरा , ग्रामीण रुग्णालय धानोरा , ग्राम पंचायत अधिकारी तालुका धानोरा यांच्या सामूहिक प्रयत्नाने व सहकार्याने शिबिर शिस्तबद्ध रित्या व शांततेत पार पडले. शिबिरात तपासणी करित्या आलेल्या सिकलसेल ग्रस्त रुग्णांनी शांततेत तपासणी करून , मोलाचे सहकार्य केले.

# गडचिरोली जिल्ह्यातील रोजगार वाढीस चालना मिळणार

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा : अल्पमुदतीचे अभ्यासक्रम हे बदलत्या काळाची गरज

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : बदलत्या औद्योगिक व कृषी अर्थव्यवस्थेत युवकांना तात्काळ रोजगारक्षम बनविण्यासाठी अल्पमुदतीचे, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले. गडचिरोली येथील क्रातीवीर बाबुराव शेडमाके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे राबविण्यात आलेल्या 'ट्रॅक्टर सर्विस मेकॅनिक' या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या २५ विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले, त्या कार्यक्रमात ते दूरदृश्य प्रणाली द्वारे बोलत होते. हा नियुक्तीपत्र वितरण कार्यक्रम दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडला. यावेळी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, राज्य नाविन्यता सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माळी, तसेच महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड कंपनीच्या कौशल्य विकास विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉन लुईस आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली जिल्ह्यातील रोजगारनिर्मितीस गती मिळत असून, येत्या पाच वर्षांत हा जिल्हा राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक ठरेल, असा विश्वासही मंत्री लोढा यांनी व्यक्त केला. गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिक युवकांना विकासप्रक्रियेचा थेट लाभ मिळावा, यासाठी कौशल्यविकास विभाग वेगाने काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री लोढा पुढे म्हणाले की, गडचिरोलीसारख्या दुर्गम व आदिवासीबहुल जिल्ह्यात युवकांना दीर्घकालीन शिक्षणाबरोबरच तात्काळ रोजगार देणारे अभ्यासक्रम आवश्यक आहेत. 'ट्रॅक्टर सर्विस मेकॅनिक'सारखे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम युवकांना थेट उद्योगाशी जोडतात. लोहखनिज व इतर औद्योगिक गुंतवणुकीमुळे गडचिरोलीत मोठ्या प्रमाणावर उद्योग उभे राहत असून, त्या पार्श्वभूमीवर कुशल मनुष्यबळ तयार करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. येथे सुरू असलेल्या मोठ्या औद्योगिक प्रकल्पांना गती देताना स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. सामान्य नागरिकाला शासनाच्या सर्व सेवा व सुविधा सहज आणि सुलभपणे मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलपणे काम करावे, असे त्यांनी नमूद केले. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी दर महिन्याला जिल्ह्याला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**स्थानिक युवकांसाठी कौशल्यवृद्धीवर भर : जिल्हाधिकारी**

जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी सांगितले की, गडचिरोलीत येणाऱ्या गुंतवणुकीचा जास्तीत जास्त लाभ स्थानिक युवकांना मिळावा, यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. युवकांची कॅपॅसिटी बिल्डिंग वाढविण्यावर भर देण्यात येत असून, विविध माध्यमांतून रोजगाराभिमुख प्रशिक्षण व कौशल्यविकास अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. आयटीआय–उद्योग सहकार्याच्या माध्यमातून युवकांना थेट रोजगाराशी जोडण्याचा हा उपक्रम त्याचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुरेश चौधरी यांनी प्रास्ताविकात माहिती देताना सांगितले की, हा अभ्यासक्रम ८ ऑक्टोबर २०२५ ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला. एकूण ३९० तासांचे, दररोज सहा तासांचे सघन प्रशिक्षण देण्यात आले. ट्रॅक्टर दुरुस्ती, देखभाल व आधुनिक तांत्रिक प्रणालींचे प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले. यात ३० प्रशिक्षणार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले. कार्यक्रमात उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी मयूर बुरले व संयोग कोहळे यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेंद्र शेंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.










जिल्हा प्रशासनाने प्रशिक्षणार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली, तर आयटीआय गडचिरोलीने निवासाची सोय उपलब्ध करून दिली. महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने प्रशिक्षणासाठी आवश्यक यंत्रसामग्री व तज्ज्ञ मार्गदर्शक उपलब्ध करून दिले. उपस्थितांचे आभार कौशल्य विकास चे सहाय्यक आयुक्त योगेंद्र शेंडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी कौशल्य विकास विभाग, शासकीय औद्योगिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच संबंधित विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# जनतेतून निवडून आलेले नगराध्यक्षही पदभार घेईनात...!

## शपथग्रहणाला 'मुहूर्त' न मिळाल्याने गडचिरोली, आरमोरी, देसाईगंज ठप्प...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

> ■ शहराचा कारभार मुहूर्ताच्या प्रतीक्षेत ठेवणे जनतेला मान्य नसून, तातडीने शपथग्रहण व पदभार स्वीकारण्यात यावा, अन्यथा नागरिकांचा असंतोष उग्र रूप धारण करु शकतो, अशी चिन्हे दिसत आहेत. मुहूर्त महत्त्वाचा की जनतेचा कौल? हाच प्रश्न आज तीनही शहरांत घुमत आहे.

गडचिरोली : गडचिरोली, आरमोरी व देसाईगंज नगर परिषद निवडणुकांचे निकाल जाहीर होऊन आठवडा उलटला आहे. विशेष बाब म्हणजे नगराध्यक्ष हे थेट जनतेतून निवडून आलेले असतानाही अद्याप त्यांनी पदभार व शपथग्रहण केलेले नाही. त्याचप्रमाणे नगरसेवकांनीही पदभार स्वीकारलेला नसल्याने तीनही नगर परिषदांचा कारभार पूर्णतः ठप्प झाला आहे. नगर परिषदेत कामासाठी जाणाऱ्या नागरिकांना "शपथग्रहण झालेले नाही, पदभार घेतलेला नाही" असेच सांगितले जात असून, लोकनिर्वाचित प्रतिनिधी प्रत्यक्ष जबाबदारी स्वीकारत नसल्यामुळे नागरिकांची अत्यावश्यक कामे लटकली आहेत. घरपट्टी, पाणीपुरवठा, बांधकाम परवानग्या, व्यापारी परवाने, स्वच्छतेच्या तक्रारी यांसारख्या विषयांवर निर्णयच होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडून दिले गेले असतानाही "मुहूर्त मिळत नाही" या कारणावर पदभार लांबवला जात असल्याने नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाच्या सत्तासमीकरणांमुळे शपथग्रहणच रखडल्याचे चित्र शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.

जनतेचा कौल मिळाल्यानंतरही जबाबदारी स्वीकारायला मुहूर्त लागतो का? मत मागताना तत्पर असलेले लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर मात्र पदभार घेण्यास विलंब करत असल्याचा थेट आरोप नगराध्यक्ष व नगरसेवकांवर होत आहे. नगर परिषद कर्मचारी आपल्या अधिकारमर्यादेत काम करत असले तरी, लोकनिर्वाचित नेतृत्वच अस्तित्वात नसल्याने निर्णयप्रक्रिया पुढे सरकू शकत नाही. ही परिस्थिती लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर असून, जनतेतून निवडून आलेल्या नगराध्यक्षांनी तरी तातडीने पदभार स्वीकारावा, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे.




# आज कुरखेडा येथे कला संस्कार महोत्सवाचा भव्य शुभारंभ

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्था कुरखेडा द्वारा संचालित संस्कार पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज तथा श्रीराम विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय व श्रीराम वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय कुरखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रेरणा मिळण्यासाठी कला संस्कार वार्षिक महोत्सव तथा विद्यार्थी, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी व माजी शिक्षक स्नेह मिलन सोहळा , व सांस्कृतिक कार्यक्रम रक्तदान शिबिर, वकृत्व स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, फॅशन शो स्पर्धा , आनंद मेळावा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक २ जानेवारी ते ४ जानेवारी २०२६ स्थळ श्रीराम महाविद्यालय श्रीराम नगर कुरखेडा येथे भव्य कला संस्कार वार्षिक महोत्सवाचा उद्घाटन समारंभ सोहळा पार पडणार आहे या उद्घाटन समारंभ सोहळ्याप्रसंगी उद्घाटक म्हणून माजी आमदार दक्षिण नागपूर सुधाकरजी कोहळे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे यावेळी अध्यक्ष म्हणून शाळा समिती अध्यक्ष तथा संस्था कोषाध्यक्ष व कार्याध्यक्ष विश्व हिंदू परिषद गडचिरोली वामनराव फाये, प्रमुख वक्ते विक्रमजीत कलाने, विशेष अतिथी म्हणून माजी आमदार कृष्णाजी गजबे संस्थापक ए .जी. बी डिफेन्स सर्विस ज्युनियर कॉलेज शहापूर नरेंद्रजी पालांदूरकर संस्था अध्यक्ष मोहनरावजी अरमरकर संस्था सचिव दोषहररावजी फाये उपाध्यक्ष गजाननराव येलतुरे,माजी सिनेट सदस्य चांगदेव फाये व संस्था सदस्य व शाळा समिती सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत कला संस्कार वार्षिक महोत्सवाचा उद्घाटन समारंभ सोहळा संपन्न होणार असून कला संस्कार वार्षिक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभ सोहळा व विविध कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य नागेश्वर फाये, श्रीराम विद्यालय प्राचार्य देवेंद्र फाये संस्कार पब्लिक स्कूल कुरखेडा व आयोजन समिती यांनी केले आहे.

# शासकीय आश्रम शाळा कोरची येथे उत्साहात नववर्ष स्वागत; 'व्यसनमुक्त शाळे' चा घेतला संकल्प

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

कोरची : स्थानिक शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, कोरची येथे १ जानेवारी २०२६ रोजी नवीन वर्षाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. या निमित्ताने शाळेत विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन वर्षाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच, 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा' या उक्तीप्रमाणे संपूर्ण परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले आणि विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गांची आकर्षक सजावट केली.

या कार्यक्रमाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'व्यसनमुक्त शाळा' करण्याची घेण्यात आलेली शपथ. विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य, शिस्त आणि सुदृढ आरोग्य राखण्याचा निश्चय केला. एक उत्तम आणि जबाबदार नागरिक बनण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याचा संकल्प यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी मिळून केला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक उमाकांत ढोक होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक भैयालाल कुरसंगे, गुरुराज मेंढे, हरेश कामडी, अरुण कायंदे , अभिमन्यू वाटगुरे,प्रमोद शंभरकर, मनोज गजभिये, धनश्री परतेती, राहुल अंधारे, कृष्णा गावडे, कुणाल गोवर्धन, सुमन अडभेया, गीता राऊत डाकराम ठाकरे, मनोज आचार्य, सुषमा अंबोणे, सिमा कुरेकार, भारती साखरे, ओमप्रकाश रहिले, प्रिती खंडाते, मयुर दोनाडकर आदी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक ढोक यांनी विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत असतानाच, वेळेचे नियोजन आणि आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना नवीन वर्षाच्या गोड शुभेच्छा देण्यात आल्या.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक
पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**